... ग्रं. सं. ठाणें
विषय अध्यात्म
सं. क्र. १५०

# भावार्थ सिंधू

२ भिकाजी गो...
नं. १९४५८ भ
मराठी ग्रंथ संग्रहालय नं० ठाणें सन १८९
११९३६

# भावार्थसिंधू.

## ग्रंथ.

## गर्भीचेंसार.

हा ग्रंथ मी आपले स्वशक्तीनें सकल जनास आत्म
व्हावें ह्मणून केला. याचीं प्रकर्णे ५ आहेत प्रथम प्रकर्णांत यो-
लिहिला आहे तो अनुभव घेऊन लिहिला तसेंच २ प्रकर्णांत भो-
भोक्ते पण कळावें ह्मणून पंचकोशाचें विवरण केलें आहे आणीं
कर्णांत देहचतुष्टय कसे व अवस्थांची लक्षणें काम १ वगैरे आत्म-
चें विवरण केलें आहे तसीच ४ थे प्रकर्णांत ज्ञानोत्तर काळीं भक्ती
होते, ती भक्तीमार्ग संपूर्ण लिहिला आहे व साधन भक्ती ही लि
हे. आणीं ५ वे प्रकर्णांत मुक्तांचीं लक्षणें व जनास उदेश कसा ... गो
हें लिहिलें आहे व या ग्रंथांत अज्ञान खंडणाची पध्दती चांगली ... सर्व
जनास घेण्यास सुलभ पडावें ह्मणोन याची किंमत अनाणे ... अ
व के आणे ठेविली आहे. ... कलांमरीं॥ राम जे
गाच। ... णि॥ ऐसा संशय धरील
मन। ... शार्थखूण॥ ... जिवींधरीं॥ २०॥ अमर

श्रीराम॥ भावार्थाची केवळ खाण ॥ वैराग्याशिं तो
डण॥ गुरुभक्तीस विनटून॥ केला प्रश्न अत्यादरें ॥१
म हा राज कवणाचें केलिया स्मरण॥ मी अक्षयि सुख
पावेन॥ उत्तर देतां ग्रंथनिर्माण॥ भावार्थसिंधूजा ह
॥ २॥ जो निश्चळ निरंजन अविनाश॥ आनंदकंद स्व
काश॥ स्मरशी अंतरींतयास॥ तरी अक्षयि सुखास
वशी॥ ३॥ परीज्ञानेंवीण न घडे स्मरण॥ सत्समागम
वीण नव्हे ज्ञान॥ भाग्यावांचून सत्समागम॥ तो ही न
डे सर्वथा॥ ४॥ भाग्य म्हण जे वैराग्य॥ अंतरीं नसावा
हींच संग॥ निःसंग झालियानें मग॥ उणें काय तुज ला
॥ ५॥ इतुकें ऐकोनी शिष्य॥ स्फुंदः स्फुंदोनी बोलत॥
बहु भाग्यें चरण प्राप्त॥ झाले आजि मज लागीं॥ ६॥
तां वरी कृपाकरा॥ भवाब्धीतूनि सहजतारा॥ संत
धा जेथें गरा॥ तेथें करा स्थिर मज॥ ७॥ ऐशी ऐक
सद्गुरु आनंदले मनीं॥ मग पातकाभिमा
वाणी तोलिले॥ ८॥ वारे भवाब्धीं
सुखरा॥ नरी आतां विच
जोजे तस॥

भूतविलास ॥ तुझा देहहीसदांश ॥ तूं अविनाशवेगळा ॥ १० ॥ जिकडेतिकडेस्थीर शांत ॥ जें सुखमय असे गगनवत ॥ पूर्णप्रकाशस्वानंद भरीत ॥ सहजाद्वैतवस्तूतूं ॥ ११ ॥ जोहाभासे पृथ्वीचा गोल ॥ वरी पसरलें असे जळ ॥ स्थावरजंगमजीवेशीं सर्व ॥ परमाणुवत केवळ तुजमधीं ॥ १२ ॥ चंद्रसूर्यग्रहतारा ॥ अनंतजगांचा पसारा ॥ परस्परांचे आकर्षणद्वारा ॥ घेती फेरा तुमधीं ॥ १३ ॥ जितुकीं चंचलनिश्चलजगें ॥ तितुका त्या पोनि वेगळा अंगे ॥ निरवयव निर्गूण सर्वांगें ॥ उपमें जोगें दुजें नसे ॥ १४ ॥ ऐसा तूं असंगशांत ॥ पापपुण्याची न चले मात ॥ अलिप्ता तुज लाभ जगांत ॥ लिप्त कोण करूं शके ॥ १५ ॥ तुझी वर्णितां थोरी ॥ कवी झाले मौन्यधारी ॥ अनिर्वाच्य नापाहोनि श्रुरी ॥ संकल्पन्य... राहिले ॥ १६ ॥ ऐसा तूं सहज असशी ॥ अभिमानें कासावीस होशी ॥ विचार करीं रे मानशीं ॥ स्फुरणा पूर्वी कोण मीं ॥ १७ ॥ पृथ्वी गोलअंडाकार ॥ म्हणोनि ब्रह्मांड नाम निर्धार ॥ तियेवरी जीव सर्व ॥ ठायिंठायिं विचरती ॥ १८ ॥ न यांचे आंत आणि बाहेरी ॥ अवकाश पसरला जो भारी ॥ तो विशाळ्यत सकळां सरीं ॥ शाम जगाचा जिव्हाळा ॥ १९ ॥ तो मी कैसा होईन ॥ ऐसा संशय धरील मन ॥ तयाचे नाशार्थ स्वूण ॥ सांगतों नीजिवीं धरीं ॥ २० ॥ अमर

जिव्हा न हालविशी ॥ मनोमय उच्चार सर्द करिशी ॥ तैं श्वासवायूथ रिशीसोडिशी ॥ तोतूं आहेशि आकाश ॥ २१ ॥ ज्ञानेंद्रियें विषय घेतां ॥ ना कांहीं मनोमय विवरितां ॥ शरिरांतील धातूशिं न खता ॥ प्रत्येक इंद्रियांत फिरविशी ॥ २२ ॥ तोतूं अंतःकर्णरूपी आकाश ॥ शब्दो त्पत्तीचा होशी ईश ॥ त्यजोनियां देहाभिमानास ॥ स्वस्वरुपास अनुभवीं ॥ २३ ॥ अरे कवच्यावरी प्राणेंद्रियांचे ॥ प्रहार होती विषयांचे ॥ साक्षित्व लागलें तयांचें ॥ ज्ञानस्वरुपा तुजलागीं ॥ २४ ॥ देहाचें रूपच त्यालाशी ॥ आणि माझें ऐसेंही म्हणशी ॥ तयावरी नियत्व टेविशी ॥ तोतूं आहेशी सद्गुरु ॥ २५ ॥ पोकळ शरीर आणि श्वास ॥ यांत साक्षित्वें करिशी वास ॥ तोतूं ज्ञानस्वरूप चिदाकाश ॥ पाहे आपणास सहजीं सहज ॥ २६ ॥ मुखाबाहेर जो अवकाश ॥ शरीरगुहेंत करी वास ॥ तोचि आधारवायूस ॥ साक्षित्व तयास शरिराचें ॥ २७ ॥ तो न घेतां वागेंद्रियाशीं ॥ बोले अंतरीं आपआपणाशीं ॥ तिये मनोमय वाणिशीं ॥ आकाशवाणिं बोलिजे ॥ २८ ॥ तूं मस्तकाचे पोकळीत ॥ चक्षुरिंद्रियाचे अंतर्भागांत ॥ कल्पीतसृष्टिरचना पाहतोस ॥ नीलपीतश्वेतादि वर्ण ॥ २९ ॥ ती मस्तकांतील मेंदूची ॥ उष्णाविद्युल्लतेचे सूक्ष्म कणाची ॥ प्राणाधारें रचिली तूंची ॥ कल्पनेची रचना ती ॥ ३० ॥

तिये कल्पनेचे वार्‍यांतरीं ॥ साक्षित्वें वर्तशी जरी ॥ तरी-
अचळात्मा अधिकारी ॥ लिप्तविकारी न कधीं तूं ॥ ३१ तूं स्वसा
क्षित्व जें करिशी ॥ तें अन्यसाक्षित्वा विसरशी ॥ मग देहांतींयें-
कल्या उरशी ॥ स्वपर साक्षित्वातीन सहज ॥ ३२ ॥ जरी साक्षि
त्व तुज असे ॥ तरी तूं वेगळा अनायासें ॥ भवाब्धींत बुडालें
ऐसें ॥ तुज लापिसें व्यर्थ कां ॥ ३३ ॥ तुझें स्वरूप निर्विकल्प ॥ सं-
सार पंचभूतात्मक अल्प ॥ तयांत बुडालों हा वाग्जल्प ॥ व्यर्थ तु-
झा अविचारें ॥ ३४ ॥ प्रतिबिंबाचे विकारें ॥ बिंबाशिं न येती शा-
हारे ॥ तेसे भवाब्धींचे विकार वारे ॥ आत्मज्ञानियां बाधक न व्हे-
ती ॥ ३५ ॥ देहघटीं प्राणजळ ॥ अंतःकर्ण प्रतिबिंब चंचळ ॥ त-
यांचे भ्रमानें तो बरळ ॥ ज्ञानी केवळ निर्भय वस्तू ॥ ३६ ॥ आ-
त्मज्ञानाशीं कांहीं ॥ फिरणें न लगे दिशा दाही ॥ बैसोनियां ठा
यींच्या ठायीं ॥ आपआपणां पाहवें ॥ ३७ ॥ स्थूल श्वास ज्ञा
नी इत्यादि ॥ देहाचें हो यक्रिमिविट् भस्म ॥ वासनात्मक रा
हे मन ॥ तें जाय देहांतरा ॥ ३८ ॥ तयाशिं असतें आत्मज्ञान ॥
तरी निर्गुणीं होतें लीन ॥ पुन्हां जिवाचे शारिरीं रिघोन ॥ यो-
नि द्वारें न भ्रमतें ना ॥ ३९ ॥ तरी आतां तूं येक करीं ॥ स्वस्वरू-
पानिर्गुणीं मनी धरीं ॥ तेणें सुखिया होऊन अंतरीं ॥ चिदाक-

रींमिसळशी ॥ ४० ॥ जैसे जळावरी जळतरंग ॥ स्फुरतां विरतां-
जळाचेंच अंग ॥ तैसा आत्मज्ञानें तूं अभंग ॥ वृत्ति असतां नसतां
ही ॥ ४१ ॥ सत्यरज्जूप्रत्यया येतां ॥ मिथ्यासर्पभयाची जाय
व्यथा ॥ तैसें आत्मज्ञानें तत्वतां ॥ जन्ममरणभय जाय ॥ ४२ ॥
परी ज्ञान झालें म्हणोनि कांहीं ॥ शरीरसाक्षित्वं जात नाहीं
॥ ध्यान धारणा योगें कांहीं ॥ विस्मृती होय देहाची ॥ ४३ ॥ तीस्थि
ती बहुकाळ नराहो ॥ मुहूर्तमात्रें लया जावो ॥ परी अनुभव तो अं
तरीं ये ॥ तो न जाय कल्पांतीं ॥ ४४ ॥ ती अनुभवाची खूण ॥ सां-
गतो ऐक चित्त देऊन ॥ राजयोग हा निर्वाण ॥ याशिं प्रमाण-
स्वानुभव ॥ ४५ ॥ मी सद्गुरुआज्ञा घेऊनी ॥ सुंदर मुधाभिन
शर्कावर्णी ॥ जाऊन बैसलों योगासनीं ॥ येकांत स्थानीं निश्च-
ळ ॥ ४६ ॥ तेथें संप्रदायपूर्वक ॥ केला स्वस्वरूपाचा विवेक ॥
तेणें वृत्तीलां चावली अधीक ॥ स्वात्मसुखभोगावया ॥ ४७ ॥
मनाशिं नावडे विषयसेवन ॥ तें झालें संकल्पशून्य ॥ नवांइं-
यांशिं सोडून ॥ अंतरीं जाऊन स्थिरावलें ॥ ४८ ॥ इकडे सह
जासना येवळे ॥ पंचप्राण स्थिरावले ॥ तेणें देहाचा चत्य भां-
डलें ॥ वृत्ती म वाटलें परमसुख ॥ ४९ ॥ तें निर्मळ शांत अविका
री ॥ जें शरीराचे आंत बाहेरी ॥ तें मीच हा भाव अंतरीं ॥ सहजीं

सहजस्थिरावला ॥ ५० ॥ इतुकीयांतनीलवर्ण ॥ निश्चळ बिंदू मसुरप्रमाण ॥ मस्तकाचे पोकळींत पूर्ण ॥ प्रकाशमान प्रगटला ॥ ५१ ॥ तयाचिया प्रकाशें ॥ पदर तुटले नाना वर्णाचे ॥ शून्यत्व लोपलें आकाशाचें ॥ झालें तत्वाचें दर्शन ॥ ५२ ॥ जैशी गोंडाळ करितां दुरी ॥ निर्मळोदक ये करीं ॥ दृष्टीस झाली तैशी परी ॥ होतां दुरी नाना वर्ण ॥ ५३ ॥ जागृत स्वप्न सुषुप्ती ॥ या अवस्थांची मोडली भ्रांती ॥ तूर्या उदेली च वस्ती ॥ ती आत्मत्वीं मिळूं पाहे ॥ ५४ ॥ तंव मस्तकाचे पोकळींत ॥ पंचज्ञानेंद्रियांचे अंतर्भागांत ॥ अंतःकर्णपंचक होतें राहत ॥ विषय तन्मयता धरोनी ॥ ५५ ॥ तें पंचप्राणाचा लोप होतां ॥ ठायींच हरपलें तत्वतां ॥ बिंदु साक्षित्वें राहिलें आतां ॥ तयाशीं व्यथा असेना ॥ ५६ ॥ त्याहळून पाहतां बिंदूकडे ॥ तंव तेंशाम सुंदर रूपडें ॥ हा संत हा संत मजकडे ॥ आकर्णनयनीं अवलोकी ॥ ५७ ॥ किरीट कुंडलें मकराकार ॥ आजानुबाहू चरणी नेपुर ॥ कौस्तुभ मुक्ताफळांचे हार ॥ जानुपर्यंत रुळताती ॥ ५८ ॥ कटक मुद्रिकांकितकर ॥ भाळीं तिलक शोभे सुंदर ॥ तो हा राजस सुकुमार ॥ बाळ दिगंबर वेषधारी ॥ ५९ ॥ परी न वलत याचें चाळवणें ॥ वेमदावणें बिंदू होणें ॥ अत्यंत प्री-

तीउपजली तेणें॥तीजिवें प्राणे सुरेचिना॥ ६०॥ इकडे पद्म कोशप्रफुल्लित॥तैशीउदरगुहा झालीविस्तृत॥ श्लेष्म प्राणेंद्रियांजाद्वारें येत॥उदरगुहे सन्मुखझालेंतें॥ ६१॥ तैंमस्तकगुहेतीलबिंदूचाप्रकाश॥उदरगुहेंतकरी प्रवेश॥ म्हणूनउदरस्थवायूचंचलत्वास॥ त्यजोनी प्रकाशासअनुसरला॥ ६२॥ नाउरग त्यजीजीर्ण त्वचेस॥ तैसात्यजोनीतनुगृहेस॥सिव्होन साक्षिणीं वृत्तीस॥ संलग्नबिंदूसतो झाला॥ ६३॥ तेव्हां ग्रहचासिल्याग्रहजैसें॥ शरीरवेगळें दिसेतैसें॥ मगपरमानंदाचेंपिसें॥ लागलें तें आवरेना॥ ६४॥ तेथें झाली नवलपरी॥ जोमींसाक्षीशरीरांतरीं॥ येकला एकचिदाकारी॥ निर्विकारी परब्रंह्म॥ ६५॥ तोमींविषयेंद्रियसाक्षित्वामुकला॥ परीतबिंदूसाक्षित्वांत राहिलों॥ बिंदूविरतांचिझालों॥ साक्षित्वातीत सहजीं सहज॥ ६६॥ जैसें दर्पणाचे लोपें॥ स्वमुखनिरिक्षणें हरपे॥ तैसें द्वैतवीण आपणापें॥ स्वस्वरूप राहणें॥ ६७॥ सर्वप्राण्यांचेंमूलतत्व॥ वायूस्वरूपबिंदूनिश्चित॥ त्यांतसाक्षीतोपरमशांत॥ अनंतअपारसहजानंद॥ ६८॥ तोमीसाक्षित्व जानांसहज॥ राहिलों स्वसुखसाम्राज्य॥ हानिर्वाणबोधाचाध्वज॥ उभविलानुजकळावया॥ ६९॥

हीस्थिती असे तुज पाशीं ॥ ऐके कतिये चे लक्षणाशीं ॥ जैं तूं आ-
पणा ब्रंह्म भाविशी ॥ तैं राहशी निश्चळ ॥ ७० ॥ सोडोनि वि
षयेंद्रियांचा भाव ॥ विश्रांतीचा पावशी ठाव ॥ तेथें वृत्ती
घे अनुभव ॥ स्व स्वरूप सुखाचा ॥ ७१ ॥ परी तीं निमिष
मात्र राहे ॥ विषयचिंतितां लया जाय ॥ प्राणेंद्रियाची स्थि
रता नोहे ॥ म्हणून न राहे बहु काळ ॥ ७२ ॥ ऐसा निमिषमा-
त्र चिंतन करी ॥ तेणेंचि निश्चय बैसे अंतरीं ॥ तो जरी-
व्यवहारेंद्रियद्वारीं ॥ परी अभिमान न धरीं तेथिंचा ॥ ७३
॥ म्हणे शरीर पिंजरा आणि प्राण ॥ यांचा साक्षी मी गगन ॥
सुखा बाहेरी आंत परिपूर्ण ॥ व्यापोनि जाण उरलों से ॥
७४ ॥ रक्त मेंदू लय पावती ॥ प्राण गगनीं स्थीर होती ॥ तें-
गगनचि मी निश्चिती ॥ मजला जाणें ये येकें ॥ ७५ ॥ मी ग
गनरूपीं निरंजन ॥ आनंदाचें जन्मस्थान ॥ कळण्या-
न कळण्याचा अभिमान ॥ वागेंद्रियावीण घेऊं कैसा ॥ ७६
॥ मी निर्गुण ऐसें भावावें ॥ तरी अंतरीं प्राणाशीं लागावें ध-
रावें ॥ येकला असतां न संभवे ॥ भावना अंतरीं येक ही
॥ ७७ ॥ आधुनिक या ज्ञानावकाशीं ॥ साक्षित्वं धरी जगाशीं ॥
म्हणून आकाशनाव ब्रंह्माशीं ॥ उत्तम प्रकारें शोभतसे ॥ ७८

साक्षित्व जरी नाहीं ॥ तरी ब्रंह्मच असे पाहीं ॥ आणि साक्षित्व असतांही ॥ उणीव कांहीं आली नसे ॥ ७९ ॥ इकडे बिंदूनें आकर्षून पंचप्राण ॥ आपण झाला ब्रंह्मीं लीन ॥ तेणें साक्षित्व गेलें हरपोन ॥ तेंच मागुतें न प्रगटलें ॥ ८० ॥ पंचभूतांचे आकर्षणें ॥ योगमुद्रेचें उडालें ठाणें ॥ मेदू चलित झाला तेणें ॥ श्वासोच्छ्वास न चालिले ॥ ८१ ॥ तो वायू सर्वेंद्रियांत ॥ भरनाच जाणीव प्रगटली त्यांत ॥ जैसें उदक घटीं येतांच ॥ प्रतिबिंब रवी भासुं लागे ॥ ८२ ॥ तैशी जाणीव प्रगटली इंद्रियांत ॥ ती पुन्हां ब्रंह्मीं लीन होत ॥ तो आनंद आनि अद्भुत ॥ वागेंद्रियें बोलतां न ये ॥ ८३ ॥ वाटे शून्यावकाश काय झाला ॥ आत्मैक्य प्रकाश उदेला ॥ पंचाविषयांचा गलबला ॥ कोठें गेला कळेना ॥ ८४ ॥ ऐशी ही आत्मज्ञानाची ॥ खूण सांपडी राजयोगाची ॥ ती तुज कारणें निरोपिली साची ॥ जी संशयाची छेदक ॥ ८५ ॥ अरे धारिरांतील जे सूक्ष्म प्राण ॥ जाणीवत्यांतील शक्ती जाण ॥ ते प्राणच गेलिया लीन होऊन ॥ जाणीव जाय त्यांसरशी ॥ ८६ ॥ विषयचिंतनें जाणीव राहे ॥ तियेशीं पुन्हां जन्ममरण ये ॥ आत्मचिंतनें पावे लय ॥ जन्ममरण भग कैंचें ॥ ८७ ॥ तरी सांगीतली जी रहणी

॥ ती तूं धरीं दृढ मनीं ॥ मग भवभयाची काहणी ॥ तुरोनि शांत राहशी ॥ ८८ ॥ तूं ह्मणशी ज्ञानियांप्रत ॥ ईश्वरत्व झालें प्राप्त ॥ तरी क्षुधातृषा तयांप्रत ॥ कासाविस कां करिती ॥ ८९ ॥ तयाचें उत्तर ऐक साचें ॥ क्षुधातृषा धर्म प्राणाचे ॥ हर्षशोक हे मनाचे ॥ शरिराचे धर्म जन्ममरण ॥ ९० ॥ शरीर प्राण आणि मन ॥ ज्ञानी वेगळा स्वरूप निर्गुण ॥ षडविकार स्पर्शती कैसेन ॥ तो साक्षित्वातीत सहज असे ॥ ९१ ॥ तयासि आनंद ना खेद ॥ ज्ञानाज्ञानाचा नसे बोध ॥ आपुला आपण सहजानंद ॥ ऐसा भाव सदांचा ॥ ९२ ॥ येर तरी विषय सोहळे ॥ अंतःकर्ण भागीं इंद्रियमेळें ॥ परी तें अभिमान ने घे ज्ञानबळें ॥ राहे स्वरूपीं आनंन्य ॥ ९३ ॥ इतुकें ऐकोनि शिष्य ॥ परमानंदें डुल्लत ॥ ह्मणे कृतकृत्य झालों निश्चित ॥ वचन मात्रें आपुल्या ॥ ९४ ॥ आत्मज्ञानाचा समूळ आवांका ॥ कळला मज सद्गुरु टिळका ॥ आतां भोगून अभोक्ता राहें निका ॥ तैसा भाव सांगावा ॥ ९५ ॥ बारे आतां दुसरे प्रकर्णीं ॥ पंचकोशाची करूं उभवणी ॥ मग तूं अतीत हें निदानीं ॥ भोगून अभोक्ते पण दाऊं ॥ ९६ ॥ श्रीदत्तकृपा नारायण ॥ पावला सहज शांती निर्वाण ॥ तयापासोन पूर्ण ज्ञान ॥ सखाराम पावला ॥ ९७ ॥ विष्णू म्हणे म-

रवाराम॥ सद्गुरु माझा पूर्णकाम॥ तयाचे कृपा पावलों पर-
म॥ सहजात्मैक्य आपुलें॥९८॥ तें शिष्याचेनिमिसें॥ स-
कळजनाशिं देतसें॥ घेतील विचारयुक्त मानसें॥ ते स्वसु-
ख अनायासें पावती॥ ९९॥ इतीश्रीभावार्थसिंधू॥ प्रथमप्र-
कर्णीं सहजानंदू॥ विष्णू म्हणे याचा छंदू॥ लागो सकळजना-
शीं॥१००॥ ॥श्रीरामार्पणमस्तू॥ छ॥ ॥छ॥ ॥

श्रीराम ॥ भावार्थसिंधूच्या प्रथम प्रकर्णीं ॥ आत्मे-
क्य तेचि दाविली वाणी ॥ जी भोगून अभोक्तेपणा-
र हयी ॥ तीया प्रकर्णीं तुज दाऊं ॥ १ ॥ तुझ्या आ-
रूपीं जाण ॥ भोक्तेपणाचें न से भान ॥ भोग अंतःकर्णीं
गून ॥ ज्ञानें अभोक्तेपण त्याशिंये ॥ २ ॥ जैसा स्वप्न सु-
खदुःख भोक्ता ॥ साक्षित्व असोन प्रबोधीं अभोक्ता ॥ तैसा
पंचकोश साक्षी मूं नत्वता ॥ राहें अभोक्ता स्वात्मबुध्धी ॥ ३ ॥
आतां पंचकोश तुज कळावे ॥ भोगून अभोक्तेपण यावें ॥ ऐ-
सें सांगतों स्वभावें ॥ परी जिवें भावें धरीं हो ॥ ४ ॥ बारे ज-
तूंचे अंगावरी ॥ शंखादी कोश कदीण भारी ॥ ज्ञानस्वरूप
जवरी ॥ पंचभूतात्मक कोश तैसे ॥ ५ ॥ जं तूंचे कोश फुटतां ॥
ते न वांचती सर्वथा ॥ तुझे कोश लय पावतां ॥ साक्षित्वानें
सहज राहशी ॥ ६ ॥ जैसा नट वेष धरी नाना ॥ तेथील हाव-
व दावी जना ॥ परी तो आपुल्या अंतरखुणा ॥ जाणे आपणा
वेगळा ॥ ७ ॥ तैसा पंचकोशांतील आपणाशीं ॥ अंतरीं पाहे
साक्षित्वेशीं ॥ तरीच भोगून अभोक्ता राहशी ॥ येन्हवीं हा
कासावीस ॥ ८ ॥ तूं म्हणशी पंचकोश कोण ॥ ऐक तयांचे ना-
माभिधान ॥ अन्नमय प्राणमय मनोमय जाण ॥ विज्ञान-

मय आणि आनंदमय॥ ९॥ या पंचकोशांसरिसा॥ दिसशी सुखदुःखभोक्ता ऐसा॥ परी यांचा साक्षी सहसा॥ भोगून अभोक्ता तूं असशी॥ १०॥ शुक्लशोणितापासून निर्माण॥ तो देह अन्नमयकोश जाण त्यांत चाविचरती पंचप्राण॥ तो प्राणमयकोश बोलिजे॥ ११॥ ज्ञानेंद्रियें जाणें विषयांशीं॥ कर्मेंद्रियें करी सर्व क्रियेशी॥ अंतरीं विवरी विषयांशीं॥ मनोमयकोश तो बोलिजे॥ १२॥ आतां मीच ब्रह्म ऐसा भाव॥ वृत्तीनें धरिला जो स्वयमेव॥ विज्ञानमयकोश हें नाव॥ तयाशिं साजे अनुभवें॥ १३॥ प्राणेंद्रियांशिं सोडून॥ वृत्ती धरी आत्मानुसंधान॥ तें आनंद होय निर्माण॥ आनंदमयकोश तो बोलिजे॥ १४॥ यया पंचकोशांचा साक्षी॥ ऐसें आप आपणा निरिक्षीं॥ मग लक्ष ठेऊन अलक्षीं॥ सुखिया होयिं बापा॥ १५॥ तंव शिष्य म्हणे जी स्वामी॥ संक्षेपें विवरण दाविलें तुम्ही॥ तेणेंच सुखिया झालों मी॥ तें वदनीं न बोलवे॥ १६॥ परी अंतरींचा निर्धार॥ ऐकावा पंचकोश विस्तार॥ होय सांगतों सविस्तर॥ जेणें अंतर निवे तुझें॥ १७॥ बारे अस्थि मांस त्वचेचा॥ अन्नमय शुक्लशोणिताचा॥ धरिला तरी न टाचे ऐसा॥ भोगून अभो-

क्ता तूं तेथें ॥१८॥ तूं तरी निर्विकल्प असशी ॥ अन्नमयाचें साक्षित्व करिशी ॥ ऐक तयाचे रचनेशीं ॥ स्पष्टतेशीं दावितों ॥ १९॥ अस्थिमांस त्वचा नाडी ॥ ही जड पृथ्वीची प्रौढी ॥ रक्तरेतादी जोडलें जोडी ॥ अन्नमयकोशीं आपतत्व ॥ २०॥ देहांतील जी उष्णता ॥ तेज तत्वाचा भाग सर्वथा ॥ चलनवलनादी क्रिया समस्ता ॥ वायुतत्वापासोनि होती ॥ २१॥ कामक्रोधादिक जे उठती तें तो आकाशतत्व निश्चिती ॥ ऐशीं पांच तत्वें कोशाकार होती ॥ म्हणून अन्नमय कोश बोलिजे ॥ २२॥ उत्पत्तीस्थिती संहार ॥ अन्नमयाचे हे विकार ॥ त्याचे त्याशिं न करूनी साचार ॥ तूं निर्विकार साक्षी तेथें ॥ २३॥ माझा देह ऐसें भाविशी ॥ परी मीच देह न म्हणशी ॥ तो तूं साक्षी अंतरात्मा होशी ॥ भोगून राहशी अभोक्ता ॥ २४॥ देहाचे अवयव तुटतां ॥ तूं साक्षी तुटशी ना सर्वथा ॥ देहाचे परमाणू होऊन जातां ॥ तूं वेगळा साक्षित्वें ॥ २५॥ स्वर्ग कोशांत ठेविलें ॥ तैसें साक्षित्व अन्नमयांत राहिलें ॥ कोश नासतां स्वर्ग उरलें ॥ तैसा अन्नमयनाशीं तूं उरशी ॥ २६॥ आतां प्राणमयकोशाचा वृत्तांत ॥ ऐक सांगतों साद्यंत ॥ तूं साक्षी वेगळा हें निभ्रांत ॥ अनुभावास तेणें ये ॥ २७॥

व्यान समान उदान ॥ प्राण आणि अपान ॥ मिळोनि होय श्वासोच्छ्वास ॥ त्याशीं प्राणमयकोश बोलिजे ॥ २८ ॥ कोशावरी जैसा कोश ॥ तैसा प्राणमयावरी अन्नमयाचा वास ॥ तूं जाणशी तयादो घांस ॥ तोच आत्मा निजवस्तू ॥ २९ ॥ जें विषयेंद्रियांशीं सोडून ॥ अंतरी पाहशी न्याहळून ॥ तें खवळल्या सिंधुवत दृश्यमान ॥ प्राणमयकोश तोचि हो ॥ ३० ॥ प्राणमयाचा जो भास ॥ त्यांतच मनोमयाचा वास ॥ तूं जाणशी अन्नमया सह तिघांस ॥ तो तूं आत्मा सहज असशी ॥ ३१ ॥ पंच ज्ञानेंद्रियें विषयभोक्ता ॥ पंच कर्मेंद्रियें क्रिया करिता ॥ तोचि मनोमयतत्वता ॥ ऐक व्यवस्था तयाची ॥ ३२ ॥ प्राणमयांत व्यापक गगन ॥ मनामयत याना माभिधान ॥ तें विषई तन्मयता धरी म्हणून ॥ सुखदुःख भोक्तेपण ये त्याशीं ॥ ३३ ॥ आतां विषयीं तन्मयता धरी कैशी ॥ ऐका तियेचे अनुभवाशीं ॥ मनोमयकोश कळतां तुज शीं ॥ भोगून राहशी अभोक्ता ॥ ३४ ॥ वस्तु प्रहारें वाता वर्ण हाले ॥ तें श्रोत्रेंद्रियांत आदळे ॥ तेथें प्रायमय कोशाचे बळें ॥ नाद कळे मनोमयाशीं ॥ ३५ ॥ नदीचिया पैलतिरीं ॥ वस्त्रें धुतां दिसे नारी ॥ तें प्रथम घायाच्या नाद अंतरीं ॥ दुसरे घायीं कळतसे ॥ ३६ ॥ ययाचें हें चि कारण ॥

अंदोलनाविलंबलागे जाण॥ नादाकडे पाहा लक्ष लाऊन॥ म्हणजे अंतरीं सर्व कळे॥ ३७॥ वाद्यें वाजती मनुष्यें बोलती॥ गगनीं विजा कडाडती॥ तेथें प्रियाप्रिय मानिती॥ म्हणून होती सुखदुःखें॥ ३८॥ तूं प्रियाप्रियत्व नसे विशी॥ आणि शब्दसाक्षित्वें वर्तशी॥ तरीं सुखदुःखातीत होशी॥ भोगून राहशी अभोक्ता॥ ३९॥ आतां स्पर्शविषयाचें लक्षण॥ त्वगेंद्रियें कळे संपूर्ण॥ तेथेंही सुखदुःख जाण॥ प्रियाप्रियत्वें होतसे॥ ४०॥ मृदुस्पर्शी तो त्याप्रिय॥ कठीण जाणिसी तोच्या अप्रिय॥ ऐसा मनाचा स्वभाव॥ म्हणून सुखदुःख होतसे॥ ४१॥ त्वगेंद्रियांत रक्त असे॥ म्हणून तेथें प्राण वसे॥ तयाचेन न्म चलनें कळतसे॥ स्पर्शविषय मनाशीं॥ ४२॥ कठीणस्पर्शी तो त्याचे घाय॥ बैसतां रक्ताचें पृथक्करण होय॥ तोचि अनुभव मनाशीं ये॥ अप्रिय म्हणून दुःखाचा॥ ४३॥ समस्पर्शी तोच मृदु लागतां॥ मनाशीं आनंद होय सर्वथा॥ कारण रक्तांत जी त्याची व्यापकता॥ ती संपूर्ण राखिली जाय॥ ४४॥ ऐसा स्पर्शविषयाचा साक्षी॥ इंद्रियांवेगळा आपणा लक्षी॥ मग भोगून अभोक्तेपणाच्या पक्षीं॥ सह-

मय आणि आनंदमय ॥ ९ ॥ या पंचकोशां सरिसा ॥ दिसशी सुखदुःखभोक्ता ऐसा ॥ परी यांचा साक्षी सहसा ॥ भोगून अभोक्ता तूं असशी ॥ १० ॥ शुक्लशोणितापासून निर्माण ॥ तो देह अन्नमय कोश जाण त्यांतच विचरती पंच प्राण ॥ तो प्राणमयकोश बोलिजे ॥ ११ ॥ ज्ञानेंद्रियें जाणें विषयांशीं ॥ कर्मेंद्रियें करी सर्वक्रियेशी ॥ अंतरीं विवरी विषयांशीं ॥ मनोमयकोश तो बोलिजे ॥ १२ ॥ आतां मीच ब्रह्म ऐसा भाव ॥ वृत्तीनें धरिला जो स्वयमेव ॥ विज्ञानमयकोश हें नाव ॥ तयाशिं साजे अनुभवें ॥ १३ ॥ प्राणेंद्रियांशिं सोडून ॥ वृत्ती धरी आत्मानुसंधान ॥ तें आनंद होय निर्माण ॥ आनंदमयकोश तो बोलिजे ॥ १४ ॥ ययापंचकोशांचा साक्षी ॥ ऐसें आप आपणा निरिक्षीं ॥ मग लक्ष ठेऊन अलक्षीं ॥ सुखिया होयिं बापा ॥ १५ ॥ तंव शिष्य म्हणे जी स्वामी ॥ संक्षेपें विवरण दाविलें तुम्ही ॥ तेणेंच सुखिया झालों मी ॥ तें वदनीं न बोलवे ॥ १६ ॥ परी अंतरींचा निर्धार ॥ ऐकावा पंचकोश विस्तार ॥ होय सांगतों सविस्तर ॥ जेणें अंतर निवे तुझें ॥ १७ ॥ बारे अस्थि मांस त्वचेचा ॥ अन्नमय शुक्लशोणिताचा ॥ धरिला तरी नटाचे ऐसा ॥ भोगून अभो-

क्ता तूं तेथें ॥१८॥ तूं तरी निर्विकल्प असशी ॥ अन्नमयाचें साक्षित्व करिशी ॥ ऐक तयाचे रचनेशीं ॥ स्पष्टतेशीं दावितों ॥ १९॥ अस्थिमांस त्वचा नाडी ॥ हीं जडपृथ्वीची प्रौढी ॥ रक्तरेतादी जोडलें जोडी ॥ अन्नमयकोशीं आपतत्व ॥ २०॥ देहांतील जी उष्णता ॥ तेजतत्वाचा भाग सर्वथा ॥ चलनवलनादी क्रिया समस्ता ॥ वायुतत्वापासोनि होती ॥ २१॥ कामक्रोधादिक जे उठती ॥ तें तो आकाशतत्व निश्चिती ॥ ऐशीं पांच तत्वें कोशाकार होती ॥ म्हणून अन्नमय कोश बोलिजे ॥ २२॥ उत्पत्तीस्थिती संहार ॥ अन्नमयाचे हे विकार ॥ त्याचे त्याशिं न कळतां साचार ॥ तूं निर्विकार साक्षी तेथें ॥ २३॥ माझा देह ऐसें भाविशी ॥ परी मीच देह न म्हणशी ॥ तो तूं साक्षी अंतरात्मा होशी ॥ भोगून रहशी अभोक्ता ॥ २४॥ देहाचे अवयव तुटतां ॥ तूं साक्षी तुटशी ना सर्वथा ॥ देहाचे परमाणू होऊन जातां ॥ तूं वेगळा साक्षित्वें ॥ २५॥ स्वर्ग कोशांत ठेविलें ॥ तैसें साक्षित्व अन्नमयांत राहिलें ॥ कोश नासतां स्वर्ग उरलें ॥ तैसा अन्नमय नाशीं तूं उरशी ॥ २६॥ आतां प्राणमय कोशाचा वृत्तांत ॥ ऐक सांगतों साद्यंत ॥ तूं साक्षी वेगळा हें निभ्रांत ॥ अनुभावास तेणें ये ॥ २७॥

व्यान समान उदान ॥ प्राण आणि अपान ॥ मिळोनि होय श्वा-
सोच्छ्वास ॥ त्याशीं प्राणमय कोश बोलिजे ॥ २८ ॥ कोशाव-
रीजैसा कोश ॥ तैसा प्राणमयावरी अन्नमयाचा वास ॥ तूं
जाणशी तयादोघांस ॥ तोच आत्मा निजवस्तू ॥ २९ ॥ जैं विष-
येंद्रियांशीं सोडून ॥ अंतरी पाहशी न्याहळून ॥ तें खवळल्या
सिंधुवत दृश्यमान ॥ प्राणमय कोश तोचि हो ॥ ३० ॥ प्राणम-
याचा जो भास ॥ त्यांतच मनोमयाचा वास ॥ तूं जाणशी अ-
न्नमया सहित घांस ॥ तो तूं आत्मा सहज असशी ॥ ३१ ॥ पं-
च ज्ञानेंद्रियें विषयभोक्ता ॥ पंच कर्मेंद्रियें क्रिया करिता ॥ तो-
चि मनोमयतत्वता ॥ ऐक व्यवस्था तयाची ॥ ३२ ॥ प्राणम-
यांत व्यापक गगन ॥ मनोमयत याना माभिधान ॥ तें विषईं
तन्मयता धरी म्हणून ॥ सुखदुःखभोक्तेपण ये त्याशीं ॥ ३३ ॥
आतां विषयीं तन्मयता धरी कैशी ॥ ऐका तियेचे अनुभवाशीं ॥
मनोमयकोश कळतां तुजशीं ॥ भोगून राहशी अभोक्ता ॥
३४ ॥ वस्तुप्रहारें वाता वर्ण हाले ॥ तें श्रोत्रेंद्रियांत आदळे ॥ ते-
थें प्राणमय कोशाचे बळें ॥ नाद कळे मनोमयाशीं ॥ ३५ ॥ न-
दीचिया पैलतिरीं ॥ वस्त्र धुतां दिसे नारी ॥ तें प्रथम घायाच्या ना-
द अंतरीं ॥ दुसरे घायीं कळतसे ॥ ३६ ॥ ययाचें हें चि कारण ॥

अंदोलनाचि लंबलागे जाण॥ नादाकडे पाहा लक्ष लाऊन॥ म्हणजे अंतरीं सर्व कळे॥ ३७॥ वाद्यें वाजती मनुष्यें बोलती॥ गगनीं विजा कडाडती॥ तेथें प्रियाप्रिय मानिती॥ म्हणून होती सुखदुःखें॥ ३८॥ तूं प्रियाप्रियत्व न घेशी॥ आधि शब्द साक्षित्वें वर्तशी॥ तरीं सुखदुःखातीत होशी॥ भोगून राहशी अभोक्ता॥ ३९॥ आतां स्पर्शविषयाचें लक्षण॥ त्वगेंद्रियें कळे संपूर्ण॥ तेथें ही सुखदुःख जाण॥ प्रियाप्रियत्वें होतसे॥ ४०॥ मृदु सम सीतोष्ण प्रिय॥ कठीण अति सीतोष्ण अप्रिय॥ ऐसा मनाचा स्वभाव॥ म्हणून सुखदुःख होतसे॥ ४१॥ त्वगेंद्रियांत रक्त असे॥ म्हणून तेथें प्राण वसे॥ त्याचेन चैतन्यें कळतसे॥ स्पर्शविषय मनाशीं॥ ४२॥ कठीण सीतोष्णाचे घाय॥ बैसतां रक्ताचें पृथक्करण होय॥ तोचि अनुभव मनाशी ये॥ अप्रिय म्हणून दुःखाचा॥ ४३॥ समसीतोष्ण मृदु लागतां॥ मनाशीं आनंद होय सर्वथा॥ कारण रक्तांत जी त्याची व्यापकता॥ ती संपूर्ण राखिली जाय॥ ४४॥ ऐसा स्पर्शविषयाचा साक्षी॥ इंद्रियांवेगळा आपणा लक्षी॥ मग भोगून अभोक्तेपणाच्या पक्षीं॥ सह-

जीं सहज पावशी ॥ ४५ ॥ आतां रूपविषयाचें जाणणें ॥ तयाचीं ऐक सकळ लक्षणें ॥ चक्षूंत प्रकाशें प्रतिबिंबणें ॥ तेथें मने होणें तन्मय ॥ ४६ ॥ प्रकाश पदार्थांशीं व्यापोन ॥ प्रतिबिंबें चक्षूंत येऊन ॥ तेथें मन तन्मय होऊन ॥ रूपविषयाचा अनुभव घे ॥ ४७ ॥ स्वांगास भोंवरफिरतां ॥ चक्षूंतील मेंदू फिरे तत्वतां ॥ तें घरें फिरती हा भास होतां ॥ लेंकुरें हर्ष पावती ॥ ४८ ॥ घरें दारें निश्चळ असती ॥ मेंदू हालतां प्रतिबिंबें हालती ॥ जैसें उदक डोलतां प्रतिबिंबें डोलती ॥ तैसा अनुभव हा असे ॥ ४९ ॥ पित्तवायू जया झाला ॥ तो भलतेंच बोले भलत्याला ॥ कारण या चक्षूंतील मेंदूच कळला ॥ म्हणून ऐसें होतसे ॥ ५० ॥ सारांश चक्षूंत प्रतिबिंब पडे ॥ तेथें मन तन्मय होय रोकडें ॥ तें प्रियाप्रियत्वें सुखदुःख जोडे ॥ येर न घडे कांहींच ॥ ५१ ॥ ऐसा रूपविषयाचा भोग ॥ भोगून अभोक्ता तूं सहज ॥ आतां रसविषयाची मोज ॥ ती ही सांगूं तुज लागीं ॥ ५२ ॥ तूं अन्नोदक खाशी पिशी ॥ त्यांतील शुध्द रस भरे जिव्हेशीं ॥ तेथें मनाची तन्मयता अपेशी ॥ सर्वकाळ झालीसे ॥ ५३ ॥ तिखट खारट कडू तुरट ॥ तीक्ष्ण

मधूर सामान्य ॥ रस पडतांच येऊन ॥ जिव्हेंतील रस तदाकार होय ॥ ५४ ॥ शर्करा मिळवितांच जैसें ॥ दुग्ध गोड होय अपैसें ॥ तैसां जिव्हा रसास मिळतां रसें ॥ तदाकार होयिंजे ॥ ५५ ॥ जिव्हा रसीं मन तन्मय ॥ मधूर होतां तदाकार होय ॥ ऐशी ही रसविषयाची सोय ॥ सांगीतली तुज लागीं ॥ ५६ ॥ ज्वरें जिव्हा रस कटु झाला ॥ तया षडरस भोजनीं बैसविला ॥ तरी तेंन मानवे तयाला ॥ म्हणे पदार्थाला कडुवट ॥ ५७ ॥ निंबरसीं शर्करा टाकिली ॥ तीतात्काळ कटुत्व पावली ॥ तैसी ज्वरिताची परी झाली ॥ जिव्हा रसवत अन्य रसमानीं ॥ ५८ ॥ टाळा जिव्हा कोरडीं होतां ॥ रसविषय न कळे सर्वथा ॥ ऐशी रसाची तन्मयता ॥ मनांशीं लागली अखंड ॥ ५९ ॥ प्रियरसीं सुखवाटे ॥ अप्रियीं दुःख झगटे ॥ स्वसाक्षित्व करितां भेटे ॥ अक्षयी सुख आपुलें ॥ ६० ॥ आतां गंधविषयाचा भोग ॥ घ्राणेंद्रियें घडे योग ॥ तेथें प्रियाप्रियत्वें सुखदुःख लाग ॥ मनोमयाशीं होतसे ॥ ६१ ॥ वस्तुमात्रांत तेल असे ॥ तें गगनीं पसरे अपैसें ॥ तयाचा संग होतसे ॥ श्वासोच्छ्वासें घ्राणेंद्रियांशीं ॥ ६२ ॥ श्वासवायू बाहेर सोडितां ॥ अथवा घ्राणीं स्तब्ध करितां ॥ गंधविषय न कळे सर्वथा ॥ मन ही स्तब्धता तैं पावे ॥ ६३ ॥ ऊद अथवा चंद-

न ॥ अग्नीत घालितां जाण ॥ त्याचें तेल वायूंत पसरून ॥ जनाचें मनीं सुख होय ॥ ६४ ॥ कांहीं तेलें घ्राणाशीं स्पर्शतां ॥ मेदूं यावें चंचलता ॥ तेणें मन पावे स्तब्धता ॥ सर्वेंद्रियांशीं विसरोनी ॥ ६५ ॥ ऐसा गंधविषयाचा जाणता ॥ त्रियाभिन्नत्वें सुखदुःखभोक्ता ॥ ह्मणून स्वसाक्षित्व करीं आतां ॥ तरी भोगून अभोक्ता राहाशी ॥ ६६ ॥ आतां वाक् पाणी पाद ॥ उपस्थ आणि गुद ॥ या कर्मेंद्रियांच्या क्रिया निर्द्वंद्व ॥ करून अकर्ता स्वसाक्षिलें ॥ ६७ ॥ या मनोमयकोशाचें मूळ ॥ मस्तकांचे मेदूंत सकळ ॥ तेथें चक्षुश्रोत्रादि इंद्रियें केवळ ॥ जडलीं आहेत अखंड ॥ ६८ ॥ त यांचिया आधारें ॥ विषयसाक्षित्व होय खरें ॥ आणि कर्में अखिल होतीं बारे ॥ परी तूं कर्तृत्वभोक्तृत्वातीत साक्षी ॥ ६९ ॥ अंतःकर्ण मन बुध्धी ॥ चित्त अहंकार पांचभेदीं ॥ मनोमयकोशीं त्रिशुध्धी ॥ भोगून अभोक्तेपण दाविलें ॥ ७० ॥ अन्नमय प्राणमयाशीं ॥ जाणें तंव जिंको मनोमयाशीं ॥ येर पाहतां स्वसाक्षित्वेशीं ॥ मनोमय ब्रह्मत्वाशीं सहज ये ॥ ७१ ॥ म्हणशी माझा देह माझा प्राण ॥ माझें मन माझें अंतःकर्ण ॥ तूं देह प्राण मना होनी भिन्न ॥ स्वात्मत्व आपुलें पाहे पां ॥ ७२ ॥ तंव शिष्य म्हणे जी स्वामी ॥ इतुकी-

याचासाक्षी तो ब्रह्मचमी ॥ बारे विज्ञानमय बोलिलों जो मी ॥ तोचि आतां उदेला ॥ ७३ ॥ तूं ह्मणशी मीच ब्रह्म ॥ विज्ञानमयकोशत याचें नाम ॥ त याचाच साक्षी परम ॥ तूं आहेशी सहजची ॥ ७४ ॥ अन्नमय प्राणमय धरून ॥ मनोभाविशी मी ब्रह्म म्हणून ॥ ती भावना तुझी तूज लागून ॥ वेगळेपणें कळतसे ॥ ७५ ॥ स्वरुपीं द्वैताचा अभाव ॥ तेथें मी ब्रह्मवृत्तीस कैंचा ठाव ॥ प्राणवायूवीण वृत्तीचें नाव ॥ बोलूंच न ये चिदाकाशीं ॥ ७६ ॥ वक्र दर्पणें पाहूं जाय ॥ तरी दिसती जन समुदाय ॥ तेंचि आपणाकडे करून पाहे ॥ तंव प्रतिती ये स्वात्मसुखाची ॥ ७७ ॥ तैसा प्राणदर्पणी वृत्ती प्रतिबिंबे ॥ विषयांचे जो अनुभव घे ॥ तो वृत्तीच्या आधारें स्वरुपीं रिघे ॥ तें म्हणे मी ब्रह्म ऐसें ॥ ७८ ॥ स्वसुखानुभवीं द्वैत नाहीं ॥ तैसा वृत्तीवीण आपणा पाहीं ॥ आणि भोगून अभोक्ता होई ॥ विज्ञानमयाचे साक्षित्वें ॥ ७९ ॥ इतुकें ऐकतांच शिष्य ॥ म्हणे वचनें पावलों निर्द्वैत ॥ तेणें जो आनंद होत तो वाचे न बोलवे ॥ ८० ॥ बारे तुजला आनंद झाला ॥ तो तुझा तुज कळला ॥ तोचि आनंदमयकोश बोलिला ॥ वृत्तीजन्य म्हणोनी ॥ ८१ ॥ आनंदाशि भोगिशी ॥ तो तूं आनंदच नव्हेशी ॥ आपुला भोग आ-

पणाशीं ॥ घडेना कीं कल्पांती ॥ ८२ ॥ ऐसा आनंदमयाचा भोक्ता ॥ तो तूं आत्मत्वें अभोक्ता ॥ ही भोगून अभोक्तेपणाची वार्ता ॥ तुज तत्त्वतां निरूपिली ॥ ८३ ॥ देह प्राण मनाचा ॥ विज्ञान आणि आनंदाचा ॥ साक्षित्व भोग भोक्तेपणाचा ॥ सहज अभोक्ता असशी तूं ॥ ८४ ॥ पंचकोशांचा साक्षी असे ॥ तयाभोगीं अभोक्तेपण येतसे ॥ येर अफाट निर्गुणाशीं नसे ॥ भोक्ते अभोक्तेपणाचें भान ॥ ८५ ॥ तूं अफाट पसरलाशी ॥ साक्षित्व तुझ्या प्रतिबिंबाशीं ॥ तें प्रतिबिंब कोण म्हणशी ॥ तरी सूक्ष्म प्राणांतमीपणाजें ॥ ८६ ॥ यावत् भाग्यांचे देह पडती ॥ परी वासनात्मक प्राण उरती ॥ आणि आत्मानुसंधाने जे राहती ॥ त्यांचे प्राण हरपती परब्रह्मीं ॥ ८७ ॥ उदक आटतां प्रतिबिंबाचा ॥ शोध लाविता लागेल कैंचा ॥ तैसा ब्रह्मीं लय होतां प्राणाचा ॥ साक्षित्वाचा ठाव पुसे ॥ ८८ ॥ प्राण असतां साक्षित्व जावें ॥ हें बोलणें फोल अघवें ॥ साक्षित्वें आत्मानुसंधान धरावें ॥ हें चलक्षण उत्तमोत्तम ॥ ८९ ॥ अज्ञानी बाह्य व्यवहार करिती ॥ तैसेच विवेकी ज्ञानी वर्तती ॥ परी ज्ञानी आत्मानुसंधानीं राहती ॥ अज्ञानी ध्याती विषयांतें ॥ ९० ॥ विषय ध्यानें जन्ममरणें ॥ आत्मानुसंधानें नित्य होणें ॥ ऐशीं-

१८७३६



ज्ञाना ज्ञानाचीं लक्षणें ॥ स्पष्ट दाविलीं तुजलागीं ॥ ९१ ॥ तं वशिष्ठ म्हणे जी स्वामी ॥ अपूर्व आज ऐकिलें मी ॥ जे व्यवहार करून परब्रह्मीं ॥ ज्ञानी राहती सर्वकाळ ॥ ९२ ॥ मा ह्यामनिचीं ऐशी भ्रांती ॥ आत्मानुसंधानें व्यवहार राहती ॥ व्यवहारीं आत्मानुसंधान निश्चिती ॥ न घडे वृत्ती येक म्हणुनी ॥ ९३ ॥ उभयानुसंधानी येके काळें ॥ वृत्तीस वर्त्ततां कैसें आलें ॥ हें विचार करितां न कळे ॥ तरी कृपाबळें सांगा आतां ॥ ९४ ॥ बारे जयामी देह ऐसें ज्ञान ॥ तो व्यवहारें धरून देहानुसंधान ॥ तैसेंच जयामी आत्मा हें ज्ञान ॥ तो आत्मानुसंधानें व्यवहारे ॥ ९५ ॥ मीपणावीण व्यवहार न होती ॥ ज्ञान्याशीं मीपण आत्माही भतीती ॥ ह्मणून आत्मानुसंधानें व्यवहारती ॥ अज्ञान्याशीं भ्रममात्र ॥ ९६ ॥ तरी आतां भितीयप्रकर्णीं ॥ आत्मज्ञान सांगूं तुजलागोनी ॥ जेणे आत्मानुसंधान धरोनी ॥ तूं वर्तशील व्यवहारीं ॥ ९७ ॥ श्रीदत्तकृपा नारायण ॥ पावला सहज शांती निर्वाण ॥ तयापासोन पूर्ण ज्ञान ॥ सखाराम पावला ॥ ९८ ॥ विष्णू म्हणे सखाराम ॥ सद्गुरु माझा पूर्णकाम ॥ तयाचे कृपा पावलों परम ॥

सहजात्मैक्य आपुलें ॥ ९९ ॥ तें शिष्याचेनिमिसें ॥ सकळजनाशिं देतसें ॥ घेतील विचारयुक्त मानसें ॥ ते स्वसुख अनायासें पावती ॥ १०० ॥ ॥ इतिश्री भावार्थसिंधू ॥ द्वितीयप्रकर्णी पंचकोश संवादू ॥ विष्णूह्मणे याचा छंदू ॥ लागो सकळजनांशीं ॥ ॥ श्रीरामार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥

श्रीराम ॥ भावार्थसिंधूच्या द्वितीयप्रकर्णी ॥ अभोक्ते
पण कळलें तुज लागोनी ॥ आतां आत्मानुसंधानें व-
र्तावयाजनी ॥ आत्मज्ञान सांगतों ॥ १ ॥ तूं निर्विकल्प-
निरभिमान ॥ देहचतुष्टयाचें अधिष्ठान ॥ व्याप्यव्यापकतेविर
हीतपूर्ण ॥ ज्ञानघन सहज असशी ॥ २ ॥ वृत्तिरहीत अनुसंधा-
न ॥ तुझें तुजला सहज जाण ॥ जैसें गगन मानी आपणा स
घन ॥ लोक शून्य ह्मणतांही ॥ ३ ॥ नाकाष्टाकारें वन्ही शोभ-
ला ॥ परी तो उष्णत्वा नाहीं मुकला ॥ तैसा ज्ञानी देहचतुष्टईं
वर्तला ॥ परी नाहीं भुलला आत्मत्वा ॥ ४ ॥ देहानुसंधानें आ-
श्चावरी ॥ बैसोनी विचरती पृथ्वीसारी ॥ तैसा देहचतुष्टय
व्यापारीं ॥ आत्मानुसंधानें वर्ते तू ॥ ५ ॥ तूं म्हणशी देहचतु-
ष्टय कोण ॥ तरी स्थूळ सूक्ष्म कारण माहाकारण ॥ तेथें मी आ-
त्मा किं लक्षण ॥ तरी साक्षी असशी वेगळा ॥ ६ ॥ आतां स्थूळ
देह असे कैसा ॥ हें ऐकें रे ज्ञान डोळसा ॥ पांचभौवतीक रचने-
चा ठसा ॥ साक्षित्वें तूं जाणशी ॥ ७ ॥ रोम त्वचा नाडी मांस ॥ अ-
स्थी सहीत पांच अंश ॥ पृथ्वी तत्वाचे यथांश ॥ तूं निर्विकल्प
जाणशी ॥ ८ ॥ लाळ मूत्र रुधिर रेत ॥ पंचभेद घर्मासहीत ॥
या आप तत्वाचे रचनेंत ॥ साक्षी अच्यूत तूं वेगळा ॥ ९ ॥ क्षु-

धा तृषा आलस्य ॥ निद्रा मैथून पांच अंश ॥ ते जन-
त्याचे य यांस ॥ परब्रह्म तूं जाणशी ॥ १० ॥ चलनव-
ळन प्रसरण ॥ निरोधन आणि अकुंचन ॥ या पंच प
वनांशांस जाणून ॥ साक्षित्वें वेगळा राहाशी तूं ॥ ११ ॥
मृत्यूस्तब्धता वायुरोध ॥ मूर्छा विस्मृती पंच भेद ॥
आकाशत त्याचे प्रसिध्ध ॥ तूं साक्षी अभेद निजात्मा
॥ १२ ॥ ऐसा पंचवीस तत्वांचा ॥ हा स्थूळ देह पंचभूतां
चा ॥ साक्षी असशी या याचा ॥ अखंडात्मा ज्ञानघन ॥
१३ ॥ देह तुटतां कूजतां ॥ तूं तुटशी कुजशी ना सर्वथा ॥
देह जळून परमाणू उडतां ॥ जळण्या उडण्यातीत तूं
॥ १४ ॥ जैसें बुद्बुद उठती नी मती ॥ परी बुद्बुदाकाशाची
न मोडे स्थिती ॥ तैसे देह येती जाती ॥ तरी तूं साक्षी आ-
त्मा अविनाश ॥ १५ ॥ तुझें अज्ञान जावें ॥ मग ज्ञानें मु-
क्तपण यावें ॥ ऐसा नसशी स्वभावें ॥ सहज ज्ञानघ-
न मुक्त असशी ॥ १६ ॥ जैसा मृत्तिकेचा घट जड ॥ ते
सा स्थूळ देह अस्थिमांसाचा दगड ॥ तूं त याचे राहोनी
आड ॥ नटासारिखा क्रिडशी ॥ १७ ॥ देहानुसंधान ना
हीं देहाशीं ॥ म्हणून सुखदुःख न कळे त्याशीं ॥ तूं-

साक्षी आत्मा होशी ॥ म्हणून भोगिशी सुखदुःख ॥ १८ ॥ सुषु
प्तींत विषयसाक्षित्व नसे ॥ म्हणून सुखदुःख न भासे ॥ तैसें-
च आत्मत्वीं साक्षित्व नसे ॥ म्हणून असे समाधान ॥ १९ ॥
तंव या शिष्य म्हणे जी स्वामी ॥ स्थूलसाक्षी तोच आत्मा मी ॥
परी साक्षित्वातीत आत्मा कैसा मी ॥ हें न कळेच सर्वथा ॥
२० ॥ साक्षित्वातीत मी आपणा जाणिलें ॥ म्हणजे माझें सु-
खदुःख गेलें ॥ तरी आतां कृपाबळें ॥ लवकर सांगा तें च म-
ज ॥ २१ ॥ बारे आतां धीर धरून ॥ ऐक लिंग देहाचें प्रकर्ण ॥
तेणें साक्षित्वातीत होऊन ॥ सहज समाधान पावशी ॥ २२ ॥
जैसा स्थूळ देह पांचभौतिक ॥ तैसाच लिंग देह देख ॥ तया-
चें विवरण ऐक ॥ सांगतों सायंत तुजलागीं ॥ २३ ॥ शब्दस्प-
र्शरूपरसगंध ॥ हे त्ती सकळे पंच विषयभेद ॥ तोच सूक्ष्म पृ-
थ्वीचा भाग प्रसिध्ध ॥ साक्षी अंतरात्मा तूं त्याचा ॥ २४ ॥ वाक्
पाणी पाद ॥ उपस्थ आणि गुद ॥ हे पांच कर्मेंद्रियांचे भेद ॥ लिं-
गदेहीं आप त्याचे ॥ २५ ॥ श्रोत्र त्वक् चक्षु जिव्हा घ्राण ॥
हीं ज्ञानेंद्रियें सूक्ष्म तेजाची निर्माण ॥ साक्षी यांचा ज्ञानघन ॥
अंतरात्मा तूं असशी ॥ २६ ॥ व्यान समान उदान ॥ प्राण आ-
णि अपान ॥ या सूक्ष्म वायू तत्वाचा जाण ॥ साक्षी अंतरी तूंच

हो ॥२७॥ अंतःकर्णमन बुध्धी ॥ चित्त अहंकार पांच भेदीं ॥ लिंग-
देहीं आकाशशुध्धी ॥ झाली पाहिजे ययाची ॥ २८ ॥ ऐसा पंचधी-
स त त्यांचा मेळावा ॥ मिळोनि लिंग देह बोलावा ॥ याचा साक्षीस-
मजावा ॥ अभेद आत्मा मी येक ॥ २९ ॥ अंतःकर्ण व्यानाधारें ॥ श्रो
त्रेंद्रियें शब्द विषय घेबारे ॥ आणि वागेंद्रियें बोले उत्तरें ॥ आव
डी सारिखीं विवरोनी ॥ ३० ॥ मन समान वायूचे आधारें ॥ त्वेगें-
द्रियें स्पर्श विषयीं वावरे ॥ हातानीं क्रिया करी त्वरें ॥ आवडी सा-
रिख्या कळोनी ॥ ३१ ॥ बुध्धी उदानाचे आधारें ॥ चक्षुरिंद्रियें रू
प विषयीं वावरे ॥ पायानी गमनागमन त्वरें ॥ करी आवडी सा
रिखें ॥ ३२ ॥ चित्त प्राणाचे आधारें ॥ जिव्हेंद्रियें रस विषय घेबा
रे ॥ उपस्थीं रति मुत्रोत्सर्ग त्वरें ॥ करी सुखास्तव आपुल्या ॥
॥३३॥ अहंकार अपानाचे आधारें ॥ घ्राणेंद्रियें गंध विषय घे
बारे ॥ आणि गुदीं मल विसर्ग त्वरें ॥ करी सुखास्तव आपु
ल्या ॥ ३४ ॥ ऐसें अंतःकर्ण पंचक प्राण पंचकाधारें ॥ ज्ञानेंद्रि
य पंचकें विषय पंचकीं फिरे ॥ आणि कर्मेंद्रिय पंचकें व्यवहारे
॥ अखिल क्रिया जात ॥ ३५ ॥ अरे निर्गुणाशीं साक्षित्वाचा भाव
॥ म्हणून आकाश तयाचें नाव ॥ अंतःकर्णादि नावें सर्व ॥ तया
चींच सांगतों ॥ ३६ ॥ प्रथम देहाचें साक्षित्व स्फुरण ॥ म्हणून

नाव अंतःकर्ण॥ तेथेंच संकल्पविकल्प झाले निर्माण॥ तयांशिं मन बोलिजे॥३७॥ निश्चय केला विषयांचा॥ म्हणून बुध्धी बोलिजे वाचा॥ निजध्यास धरिला तयांचा॥ म्हणून चित्त बोलिजे॥३८॥ माणाधारें मीपण स्फुरे॥ म्हणून अहंकार नाव खरें॥ ऐसें कर्तृत्व भोगतृत्व सारें॥ अंतःकर्णपंचकास लागलें॥३९॥ कामक्रोध लोभ मोह॥ मद मत्सर द्वेष समूह॥ आशा तृष्णा वासनादी भाव॥ अंतःकर्णपंचकाचे सर्व असती॥४०॥ जिण्यामरण्याची चिंता॥ दुःखाचा त्रास सुखाची आस्था॥ मेल्यावर कैशी गती ही वार्ता॥ अंतःकर्णपंचक करीतसे॥४१॥ नौकागमन गणित विद्या॥ बाष्पयंत्र विमान विद्या॥ विद्युयंत्रादि अनेक विद्या॥ अंतःकर्णपंचक अभ्यासी॥४२॥ देव सगुण देव निर्गुण॥ हा धर्म उत्तम हा धर्म आधम जाण॥ तेसेंच मी कोण हें न कळे म्हणून॥ अंतःकर्णपंचक बोभाय॥४३॥ अथवा मीच ब्रंह्म म्हणें॥ अभ्यासी समाधीचीं लक्षणे॥ शेवटीं त्यागी कांहीं नाहीं होणे॥ अंतःकर्णपंचकें यथामीती॥

॥४४॥ करी मंत्रजपकां हटयोगे ॥ वांच्छी सिध्धी देवतादिकांचे भोग ॥ तेथे अंतःकर्ण पंचकाचा नर्देच लाग ॥ मग आप आपयांत कुसमुसी ॥ ४५॥ कां रसमिश्रणे सुवर्ण करीन ॥ ऐसा च धरी अभिमान ॥ शेवटीं मिथ्या हें जाणून ॥ अंतःकर्ण पंचक तळमळे ॥ ४६॥ मी मांत्रिक सिध्धा कि मयागर ॥ ऐसे अंतःकर्ण ढोंग माजवी थोर ॥ शेवटीं स्त्रीद्रव्याचे होऊनि चोर ॥ पळून जाय कां फजीत होय ॥ ४७॥ मी गाणापत्य सौर शाक्त ॥ वैष्णव शैव शास्त्रोक्त ॥ मी मोठा देव पाठक ॥ अंतःकर्ण पंचकास हे अभिमान ॥ ४८॥ मी ख्रिस्त कां मुसलमान ॥ अथवा मी बुधि जैन ॥ सर्व अंतःकर्ण पंचकाची ढोंगे जाण ॥ आत्मज्ञाना वाचोनी ॥ ४९॥ ऐसा अंतःकर्ण पंचकाचा खेळ ॥ सांगतां न पुरे सर्व काळ ॥ ह्मणून अल्प संकेतें केवळ ॥ मूळ हेतू निरोपिले ॥ ५०॥ ऐशिया अंतःकर्ण पंचकाशीं ॥ प्रियाप्रियत्वें सुख दुःखाच्या राशी ॥ तूं न याचा साक्षी वेगळा आहेसी ॥ ज्ञानें होशी सुखदुःखातीत ॥ ५१॥ माझें अंतःकर्णीचें मळाच ठावें ॥ ऐसें बोलशी स्वभावें ॥ तोच अंतःक-

र्णाचा साक्षी तूं जाणावें ॥ सुखदुःखातीत आपणा ॥ ५२॥ माझें मन बुध्धी चित्त ॥ म्या अहंकार धरिला निश्चित ॥ तो- तूं साक्षी त्याचा निभ्रांत ॥ तयांचे सुखदुःखावेगळा ॥ ५३ ॥ बारे रोग्याचें जो सुख दुःख पाहे ॥ तयापाहाण्यारा सु- खदुःख नोहे ॥ तैसाच अंतःकर्ण पंचकीं जो भोग होय ॥ तयाचा साक्षी तूं सुखदुःखातीत ॥ ५४ ॥ अंतःकर्णे सुखदुःख विसरावें ॥ तेंचि मुक्त हें अज्ञान्याशिं मानवे ॥ तरीं सुषुप्ती समईं सुखदुःख नोहे ॥ मग तया मुक्त कां न म्हणती ॥ ५५॥ तरीं अंतःकर्णाशीं सुखदुःख होतां ॥ तूं- साक्षी सुखदुःखापरता ॥ राहाशी तरीच भोगिशी मुक्त- ता ॥ नातरी शीण होय ॥ ५६ ॥ अंतःकर्णाचा लय होतां ॥ मुक्तपण येतें तत्वता ॥ तरी मूर्छाकाळीं अंतःकर्ण हर पतां ॥ तया मुक्त कां न म्हणती ॥ ५७॥ म्हणून अज्ञान्या चे बोल न मानावे ॥ त्वां अंतःकर्णाचे साक्षित्वें राहवें ॥ ऐसें आत्मानुसंधानें व्यवहारावें ॥ आणी भोगून राहा- वें अभोक्ता ॥ ५८॥ तंव शिष्य म्हणे जी गुरुनाथा ॥ अंतः कर्ण पंचक सुखदुःखाचा भोक्ता ॥ तयाचा साक्षी मीं सुखदुःखापरता ॥ हें अनुभवास आलें माझिया ॥ ५९॥

परीसीअंतःकर्णसाक्षीकैसाआहे॥ऐसेंयेकाग्रतेनेपाहें॥तरीमाझामजलाप्रत्ययनये॥अमुकलक्षणाचामीऐसा॥६०॥बारेयाचेंचनावकारणदेह॥हाचलिंगदेहाचेंबीजपाहे॥याचियानाशींअंतःकर्णशाहे॥भर्जितबीजासारिखें॥६१॥भर्जितबीजखावयागोड॥परीपेरिलियानुगवेझाड॥तैसेंज्ञानेंजळालियाअज्ञानजड॥अंतःकर्णाशिंजन्मनये॥६२॥अंतःकर्णचधरीअज्ञानभाव॥कारणदेहतयाचेंनाव॥तेणेंचधरितांमीब्रह्महाभाव॥कारणदेहमगकैंचा॥६३॥बारेतूंपंचप्राणातमीपणेंस्फुरशी॥आणिविषयेंद्रियप्राणाशिंजाणशी॥तोचतूंआपणापाहूंजाशी॥तेंधरिशीनेणीव॥६४॥तीतुझीनेणीवतुजलाकके॥मगआपणवेगळाहेंकानविवके॥तरीआतांविचारबकें॥आधआपणाजाणावें॥६५॥तूंवागेंद्रियांशिंसोडून॥प्राणाधारेंम्हणशीमीम्हणून॥तोचअंतःकर्णआकाशहीरवूण॥धरींभावनेंशिंओपुल्या॥६६॥अंतःकर्णपंचकअसेआकाश॥प्राणाविणोमीम्हणतांनयेत्यास॥नरीसोडूनियांनकळयास॥मीआकाशऐसेंभावावें॥६७॥अंतःकर्णेंमीआकाश

भाविलां ॥ तयाशिं येब्रंह्म सायोज्यता ॥ कारणदेहस्य पदा थीं सुखें शून्यता ॥ तेंच आपण मानितां शून्यकैचें ॥ ६८ ॥ साक्षित्वाच्या अवकाशीं ॥ धरीइंद्रियप्राणाशीं ॥ म्हणून आकाशनामब्रंह्मासी ॥ येरस्वतः तरी नावनसे ॥ ६९ ॥ तूं निरवयव आकाश आहेशी ॥ तोच प्राणाधारें आपण्या पाहशी ॥ तेंन कळणें स्फुरे तुजशीं ॥ रज्जूसर्पवत मिथ्या तें ॥ ७० ॥ तूं आकाशज्ञानघन ॥ मी म्हणतां न ये प्राणाधारावीण ॥ मग न कळणे असेल कोठून ॥ सांग विचारोन तूं आतां ॥ ७१ ॥ तूं प्राण पंचकाशिं सोडून ॥ ये कटे अंतःकर्णी भावी मी म्हणून ॥ तरी तुझें बोलणें प्रमाण ॥ मी मला न कळे हें ॥ ७२ ॥ तंव शिष्य म्हणे जी स्वामी ॥ प्राणाशिं सोडून भावितां न येमी ॥ परी निश्चल शांत आहें मी ॥ ऐसें आतां वाटतसे ॥ ७३ ॥ बारे निश्चल शांत मी आहें ॥ याचेंच नाव महाकारणदेह ॥ ही भावना प्राणाधारें होताहे ॥ आणि कळताहे तुझी तुजला ॥ ७४ ॥ परी निश्चळ शांत ही भावना ॥ प्राणाधारें भाविली जाणा ॥ तियेचा साक्षी तूं निर्वाण ॥ भावनेंरहीत सहज असशी ॥ ७५ ॥ अंतःकर्णप्राणातील साक्षित्व भाव ॥ कळणे न कळणे त

याचा स्वभाव ॥ प्राणाहून वेगळा राहतां दाव ॥ होऊन जा-
णरे कथलें ॥ ७६ ॥ तंव शिष्य मौन्य राहिला ॥ मी ब्रह्म भा-
वनेचा विसर झाला ॥ येऊन बोध संपला ॥ आत्मज्ञाना
चा कळस हा ॥ ७७ ॥ बा रे तूं मौन्य कां राहशी ॥ सांग का-
य करूं तुजशीं ॥ तंव शिष्य अति उल्हासीं ॥ उचंबळू-
न बोलतसे ॥ ७८ ॥ अहो सोडून देहप्रणाशीं ॥ पाहूं गे-
लों आपआपणाशीं ॥ तंव भावातीत स्वस्वरूपाशीं ॥
वृत्ती त्यागेशीं अनुभविलें ॥ ७९ ॥ मी देहपिंजरा हें भावा-
वें ॥ तरी श्वासोच्छ्वासास लागे धरावें ॥ मी देहाचा सा-
क्षी ऐसें मानावें ॥ तरी श्वास पाहिजे ॥ ८० ॥ मी कोण
हें करून नाहीं ॥ प्राणाधारें च भावना होतसे ही ॥ मी ब्रह्म
भावावें तरी ही ॥ प्राणाधारें घेणें पडे ॥ ८१ ॥ प्राणाधार-
सोडून पाहतां ॥ भावनाच नाहीं तत्त्वतां ॥ मुक्त बंध ही
वार्ता ॥ स्वस्वरूपीं असेना ॥ ८२ ॥ माझा देह आकाश ॥
अवयवरहित चिद्विलास ॥ भानभाव असोन हे तास ॥
ठाव न से कल्पांतीं ॥ ८३ ॥ श्वासोच्छ्वासां ताशिरावें ॥
तरी मी ब्रह्म हें भावावें ॥ ऐकला राहलां स्वभावें ॥ मी भ-
ण्यातीत सहजीं सहज ॥ ८४ ॥ देहचतुष्टयांच्या कल्प-

ता ॥ म्हणसी निर्गुणत्वें केंस्या जाणा ॥ त्यो अस्तां नस्तां निर्गुणपणा ॥ उणें अधीक नकेची ॥ ८५ ॥ दश इंद्रियें व्यवहारतां ॥ माझें आत्मत्व न मोडे सर्वथा ॥ देह राहतां अथवा जातां ॥ मी आत्मा सहज असें ॥ ८६ ॥ आत्मानुसंधानें व्यवहार होती ॥ ही आली मज ला प्रतीती ॥ आतां जागृत स्वप्न सुषुप्ती ॥ या अवस्थांची गती मज सांगा ॥ ८७ ॥ अरे तूं श्वासोच्छ्वासां नसाक्षी असशी ॥ तो च नाडिमांत नव्यवहारशी ॥ आणि शरीर पृथ्वीचें ओझें वाहशी ॥ तें जागृती बोलिजे ॥ ८८ ॥ जें शरीर पृथ्वीचें ओझें टाकिशी ॥ आणि रक्तरेतादी आपतत्वीं राहाशी ॥ तें काल्पित शरीं ष्टीक के तुज शीं ॥ स्वप्न तयाशिं बोलिजे ॥ ८९ ॥ पृथ्वी आपाशिं सोडून ॥ जवरा भीन होशी लीन ॥ भोगिशी ऐक्यते चे सुख लागून ॥ सुषुप्ती तियेशिं बोलिजे ॥ ९० ॥ सुषुप्तींत श्वासोच्छ्वास लांब चाले ॥ याचें कारण तुज कळलें ॥ पृथ्वी आपाचें ओझें उतरलें ॥ म्हणून सालामोकळा ॥ ९१ ॥ मस्तकावरील ओझें उतरतां ॥ हमाल सुख पावे तत्वता ॥ तैसें सुषुप्तींत ओझें राहतां ॥ तूं साक्षी विश्रांती पावशी ॥ ९२ ॥ आतां तूं यां वस्था असे केशी ॥ कळावया सांगतो तुज शीं ॥ सोडून पृथ्वी आप तेजाशीं ॥ श्वास शरीरावकाशीं स्थिरावती ॥ ९३ ॥

त्यांत तूं जो साक्षी असशी ॥ तो प्रकाशमय गगन आपणा जा-
णशी ॥ आणि निःशेष विषयेंद्रियांशिं विसरशी ॥ तेंचि सुखाशिं पारन से ॥ ९४ ॥ मग जैसें अभ्र आकाशीं विरे ॥ तैसा वायु बुद्धि यारूपीं जिरे ॥ तैं अत्यंत सुखिया होशी बारे ॥ ती अवस्था उन्मनी ॥ ९५ ॥ निःशेष वायु विराला ॥ तेव्हां साक्षित्वाचा भाव गेला ॥ तुझा आनंद तुझिया अंगीं संचला ॥ द्वैतरहित जैसा तैसा ॥ ९६ ॥ स्मरण विस्मर यांशिं गेलें ॥ तेथें गुरु शिष्य त्व कोठें राहिलें ॥ तंव शिष्य विनऊन बोले ॥ सेवा आपुली मज द्यावी ॥ ९७ ॥ अरे द्वैत न सतां सेवा मागशी ॥ हें तो अपूर्व वाटे मज शीं ॥ तरी आतां चतुर्थ प्रकर्णी तुज शीं ॥ गुरु भक्तीशिं सांगेन हा ॥ ९८ ॥ ही श्रीदत्त कृपा नारायण ॥ पावला सहज शांती निर्वाण ॥ तया पासोनि पूर्ण ज्ञान ॥ सखाराम पावला ॥ ९९ ॥ विष्णु म्हणे सखाराम ॥ सद्गुरु नाम्ना पूर्ण काम ॥ तयाचे कृपा पावलों परम ॥ सहजात्मैक्य आपुलें ॥ १०० ॥ तें शिष्याचे निमिसें ॥ सकळ जनांशिं देतसें ॥ घेता ल विचार युक्त मानसें ॥ ते स्वसुख अनायासें पावती ॥ १०१ ॥ इति श्री भावार्थ सिंधू ॥ त्रितीय प्रकर्णी आत्मबोधू ॥ विष्णू म्हणे याचा छंदू ॥ लागो सकळ जनांशीं ॥ १०२ ॥ श्रीरामार्पणमस्तु ॥

श्रीराम ॥ भावार्थसिंधूच्यात्रितियप्रकर्णी ॥ आत्मज्ञा-
न झालें तुजलागोनी ॥ आतां ज्ञानोत्तरभक्तीची निशाणी
॥ ती याप्रकर्णीं तुज दाऊं ॥१॥ तूं तो अद्वैत निर्विकार ॥
देहचतुष्टयातीत साचार ॥ निश्चल अविनाश निरंतर
॥ आत्मा प्रिथक रसकांचा ॥२॥ गुरुशिष्यदेवभक्त
॥ हा भेद नसे किंचित ॥ सेव्य सेवकपण कैंचें तेथे ॥ तूं
निर्द्वैत निजात्मा ॥३॥ परी अंतःकर्णपंचक जेथें आहे ॥
तेथें आत्मैक्य भक्ती लागलीपाहे ॥ उठतां बैसतां नराहे ॥
अनुसंधानातियेचें ॥ ४ ॥ तीच ज्ञानियांशिं तारक होय ॥
अज्ञानियांशिं असोन व्यर्थ जाय ॥ ऐशी जी आहे सोय ॥
तीच सांगतों तुजलागीं ॥ ५ ॥ बारे सर्वांशिं आपुलें पण
प्रिय ॥ कोणाशिंच नचारे अप्रिय ॥ परी ज्ञानियांशिं मी आ-
त्माही सोय ॥ म्हणून प्रियत्व राहे आत्मत्वीं ॥ ६ ॥ आपुली
आपयाअसे भक्ती ॥ आपुली आपण सेवा करिती ॥ ज्ञा
नियांशिं आपण आत्माही प्रतीती ॥ म्हणून तीच सेवाभ-
क्ती आत्म्याची ॥ ७ ॥ आप आपणा सर्व स्मरती ॥ आप-
आपणा सर्व ध्याती ॥ ज्ञानी आपणच आत्मा निश्चिती ॥
म्हणून तेंच स्मरणध्यान आत्म्याचें ॥ ८ ॥ आपुले सुखा-

स्त व्यवहार॥ करिताती लाहान थोर॥ ज्ञानियांशिं आपण आत्मा हा निरधार॥ म्हणून व्यवहार आत्मार्पण॥९॥ आपुले सुखास्तव देशाटण॥ करिताती सकळजन॥ ज्ञानी आपण ब्रह्म निर्गुण॥ ऐसें ब्रह्मार्पण फिरण्याचें॥१०॥ आपुले कलत्रपुत्र॥ ऐसें कल्पिती प्राणिमात्र॥ ज्ञानि आपण आत्मा स्वतंत्र॥ ह्मणून कलत्रपुत्र आत्म्याचें॥ ११॥ आपुलें ग्रह क्षेत्र वृत्ती॥ सकळ जीव मानिती॥ ज्ञानी आपण आत्मा निश्चिती॥ म्हणून ग्रह क्षेत्रादि आत्मार्पण॥ १२॥ आपुला सकळ संसार॥ ऐसा जिवांचा निर्धार॥ ज्ञानी आत्मा निरंतर॥ त्याचा संसार आत्मार्पण॥१३॥ आपुले सुखास्तव विषय भोग॥ आपुले सुखास्तव विषय त्याग॥ ज्ञानी आपणच आत्मा निःसंग॥ म्हणून त्याग भोग आत्मार्पण॥१४॥ आपुले सुखास्तच कर्म करिती॥ आपुले सुखास्तव कर्म त्यागिती॥ ज्ञानी आपण आत्मा निश्चिती॥ म्हणून कर्णे न कर्णे आत्मार्पण॥१५॥ आपुले सुखास्त व राजसेवा॥ आपुले सुखास्तव नीचसेवा॥ ज्ञानियांशिं आपण आत्मा हा भाव॥ म्हणून सेवा आत्मार्पण॥१६॥ आपणाकरितां मिळविती द्रव्य॥ आपणाकरितां शिक-

तीकाव्य॥ ज्ञानी आपण आत्मा निरवयव॥ म्हणून द्रव्यकाव्य आत्मार्पण॥ १७॥ आपणा करितां राजयोग॥ आपणा करितां हट योग॥ ज्ञानी आपण आत्मा अव्यंग॥ म्हणून योग आत्मार्पण॥ १८॥ आपणा करितां गुरुभक्ती॥ कर्णें लागे निश्चिती॥ ज्ञानी आपण आत्मा ही घे प्रतीती॥ म्हणून गुरुभक्ती आत्मार्पण॥ १९॥ आपुले सुखास्तव संकल्प॥ करितात अल्प स्वल्प॥ ज्ञानी आपण आत्मा निर्विकल्प॥ म्हणून त्याचे संकल्प आत्मार्पण॥२०॥ आपणास्तव जें नादरू॥ आपणास्तव शास्त्राधारु॥ ज्ञानियांशि आपण आत्मा हा निर्धारु॥ म्हणून भजन शास्त्र आत्मार्पण॥२१॥ आप आपली सर्वांशिं गोडी॥ आप आपली सर्वांशिं आवडी॥ परी जयासी आत्मा ही जोडली जोडी॥ त्याची आवडी गोडी आत्मार्पण॥ २२॥ बारे फार बोलून काय॥ येकच अवघा उपाय॥ जयासी ब्रंह्म [illegible]॥ [illegible] सर्व ब्रंह्मार्पण॥ २३॥ तो प्रत्यय ह्मणशी केसा॥ तरी मागील प्रकर्णीं सांगीतला तैसा॥ बाणे ल जयाचे मानसा॥ त्याची सहज क्रीडाच गुरुभक्ती॥२४॥ या हा काय अज्ञानीं न करिती गुरू॥ कां न करिती मी ब्रंह्म हा उच्चारु॥ परी आपण आत्मा हा नसे साक्षात्कारु॥ म्हणून या न पुंण्यें भोगिती॥२५॥ जयासा क्षात्कारा-

चीसोय॥ त्याचेंसर्वब्रंह्मार्पणहोय॥ प्रारब्धसंचितक्रियामा
णजाय॥अहंकारेंशिंआत्मत्वीं॥ २६॥ साक्षात्कारपुसशीका
ई॥ तरी मीआत्माऐसानिर्धारपाहीं॥नटळेचज्याचाकहीं॥
साक्षित्वअसोनदेहाचें॥ २७॥ आत्मस्वरुपीं साक्षित्वनसे
॥साक्षित्वअंतःकर्णासलागलेंसे॥ अंतःकर्णआकाशतत्
त्वअसे॥ अन्यतत्वासरिसेंतेंजाय॥ २८॥ जेसेंकांउदकआ
टतां॥ प्रतिबिंबलोपेतत्वता॥ तैसावायूतेजादिकांचालयहो
तां॥ साक्षीआकाशलयपावे॥ २९॥ म्हणूनवायुतेजादिकीं
असावें॥ आणिसाक्षीआकाशेंनसावें॥हेंकल्पांतींहीनसं
भवे॥मगव्यर्थश्रमकासया॥ ३०॥ त्यादेहाचें साक्षित्वजीव
॥ म्हणूनश्रमनकरावे॥ आत्मानुसंधानधरावें॥ अंतःकर्णीं
सर्वदां॥ ३१॥ अंतःकर्णीनेणिवेचाभाव॥ तोचदेहांतीं प्राणा
शिंराहवयाठाव॥आणीप्राणवायूंत साक्षित्वाचाभाव॥
राहेदेहाभिमानघेऊनी॥ ३२॥ म्हणूनपुन्हांजन्मयें॥जन्
न्मआलियासुखदुःखहोय॥ तरीतूंमीआत्माहीधरींसोय
॥आमरणपर्यंत॥ ३३॥ देहांतींमीब्रंह्महाभावराहतां॥प्रा
णाच्यालयहोयतत्वता॥ तयासंगेंसाक्षित्वाभिमानजातां॥
जन्ममरणतुजनये॥ ३४॥ अंतःकर्णधरीनिश्चलस्थिती॥

तरी प्राण सह जलय पावनी ॥ जैसा पृथ्वी प्रळयांनी ॥ जिवांशिं मृत्यूचुकेना ॥ ३५ ॥ अंतःकर्ण पंचक म्हणजे-आकाश ॥ वायुतेजादिकांचें कारण विशेष ॥ तें चल व पावनांनिःशेष ॥ वायुतेजादि कार्यें जाती ॥ ३६ ॥ देह-प्राण कार्य पाहे ॥ कारण साक्षी आकाश आहे ॥ कार्य जातां कारण राहे ॥ परी कारण जातां कार्य नुरे ॥ ३७ ॥ कार्य असोन कारण गेलें ॥ हें ऐकोनी मला हसूं आलें ॥ जैसें जल आटतां तरंग उरले ॥ तैसें बोलणें हें दिसे ॥ ३८ ॥ म्हणून साक्षी आकाश कारण आहे ॥ तंव देह प्राण न कार्य राहे ॥ साक्षी आकाश लीन होय ॥ तरी तत्कार्य न राहे-प्राणादी ॥ ३९ ॥ साक्षी आणी अंतःकर्ण पंचक ॥ म्हणती सूक्ष्म आकाशास ॥ तेंच धरी ज्ञानाज्ञानास ॥ बंध मोक्षास कारण जें ॥ ४० ॥ तूं म्हणशी दिहांतीं ॥ मी ब्रह्मभावन राहे निश्चितीं ॥ अंती अनेक व्यथा होती ॥ तें वृत्ती भांबावे ॥ ४१ ॥ बारे जेथें जया आत प्रीती ॥ तेंच स्मरण तया अंतीं ॥ हें न चुके कल्पांतीं ॥ विचार करितां दूसरा ॥ ४२ ॥ धन लोभी आणि स्त्रैण ॥ यांची स्त्री धनावरी प्रिती जाण ॥ तेंशी आत्मस्वरुपी प्रीती पूर्ण ॥ आत्मज्ञानि यांची राहत से ॥

॥४३॥ स्त्रैण आणि धन लोभ्यापाशीं॥ अन्य वस्तू त्या अ-
सती राशी॥ परी अंतीं स्मरती स्त्रीधनाशीं॥ अतिप्री-
ती म्हणोनी॥ ४४॥ तेसेंच अंत्यविषयांशीं॥ वस्तुमात्राचें
साक्षित्व त्यांशीं॥ परी अंतीं स्मरती आप आपणाशीं
॥ अतिप्रीतीं म्हणोनी॥ ४५॥ अज्ञानियांशिं प्रितीचें-
स्मरण॥ मग ज्ञानियांशिं कां नव्हे जाण॥ देहांतीं प्रीती-
ने आत्मस्मरण॥ तेणें आत्मगती पावती॥ ४६॥
दीप अंतीं तेजस्वी होय॥ तैसा मृत्यूसमईं देहावरी ये॥
सर्वेंद्रियें टंवकारिताहे॥ तें स्मरण होय प्रियवस्तूचें॥
४७॥ म्हणून आत्मस्वरुपीं प्रीती धरीं॥ आणि सुखें रा-
हीं संसारीं॥ मग तुझी भक्ती च सारी॥ सहजचि आवडे-
लती॥ ४८॥ आहमात्मा हें तुज ळा ज्ञान॥ तेणें आत्म
स्वरुपाची आवडी पूर्ण॥ तीच भक्ती आत्मनिवेदन॥
पराभक्ती तीच की॥ ४९॥ भक्ती म्हणजे काई॥ पदार्थ
आहे ऐसें नाहीं॥ स्वस्वरुपाची आवडी पाहीं॥ तीच भ
क्ती बोलिजे॥ ५०॥ जया आत्मैक्य तेची भक्ती॥ तया-
देहादिकांची विरक्ती॥ म्हणून भक्ती आणि विरक्ती॥ ज्ञा-
नी च पावती गुरुकृपा॥ ५१॥ तूं म्हणशी गुरु तो कोण॥

तरी सकळविश्वच गुरु जाण ॥ परी मुख्य गुरु आपुला-
आपण ॥ दुजा आत्मज्ञान दाता तो ॥ ५२ ॥ आपुला आप-
ण गुरु असतां ॥ अज्ञानें राहिलें तत्वता ॥ म्हणून श्रेष्ठ
गुरु आत्मज्ञान दाता ॥ भ्रम दवडिता जो असे ॥ ५३ ॥
या सकळ गुरूंचीं लक्षणें ॥ सांगतों कळावया कारणें ॥
तरी तूं ऐकोनि यांमनें ॥ सर्वांशि नम्र असावें ॥ ५४ ॥
तूं जननींउदरांतून पृथ्वीवरी ॥ जन्म धरिलाशि जे अ-
वसरीं ॥ तैं तुज ला कांहीं तरी ॥ कळत होतें कां सांग ॥
५५ ॥ खावया प्यावया लोकीं शिकविलें ॥ चालाया बो-
लाया लोकीं शिकविलें ॥ बरें वाईट लोकीं शिकविलें ॥
म्हणून गुरु झाले सर्वही ॥ ५६ ॥ लेखन वाचन अर्थज्ञा-
न ॥ सत्यासत्यविवेचन ॥ आस्तिक नास्तिकांचे परि-
णाम ॥ लोकीं जाणा शिकविले ॥ ५७ ॥ सर्व लोकीं शिक
विलें ॥ तें त्वां स्वबुध्धीनें विवरीलें ॥ त्यागात्याग मिसें ग्र-
हण केलें ॥ तस्मात गुरू तु ज्ञातू ॥ ५८ ॥ परी स्थिरचर
श्टष्टीपासोन ॥ प्रपंच परमार्थ कळला जाण ॥ म्हणून
सर्वच गुरू ही खूण ॥ जाणून नम्र असावें ॥ ५९ ॥ तैसें
च त्वां ग्रंथ पाहिले ऐकिले ॥ परी आत्मत्वाचें अज्ञान रा-

हिलें ॥ तें मी तुझें घालविलें ॥ म्हणून मुख्य गुरु मी असें ॥ ६० ॥ प-
रि मी समजल्यास कोण ॥ साक्षि त्यातीत सहज निर्गुण ॥ त्याम-
जला देतनु मन धन ॥ म्हणजे गुरु भजन जाहलें ॥ ६१ ॥ जीत
नु मन धन देऊं कैसें ॥ हें सांगा कके ऐसें ॥ अरे ज याचा तुजला
अभिमान नसे ॥ तें मजला पावलें ॥ ६२ ॥ तूं ज यामी माझें म्ह-
णशी ॥ मी निरभिमान ने घे त्याशीं ॥ जरी इच्छा अभिमान
सोडिशी ॥ तरीच ब्रह्मार्पण घडेल ॥ ६३ ॥ पंच विषय तुजला
क ळनी ॥ संपूर्ण विश्वाची तीच गणती ॥ त्यांची इच्छा सो-
डणे निश्चिती ॥ तेंच धनार्पण जाणावें ॥ ६४ ॥ स्थूल सूक्ष्म-
कारण महाकारण ॥ चारी तनुंचा सोडी अभिमान ॥ तनु आर्प-
णाची ही खूण ॥ निश्चयें त्वां जाणावी ॥ ६५ ॥ विषय धनेच्छा
तनुं अभिमान ॥ सोडितांच मन होय लीन ॥ हें बोलिलो म-
नार्पण ॥ निश्चयें त्वां समजावें ॥ ६६ ॥ इतुकें ऐको निशिष्य ॥
उगाच बैसला निवांत ॥ सद्गुरु रूप ब्रह्म सशांत ॥ तेंच होऊ न
राहिला ॥ ६७ ॥ विषय धनाशा सोडितां ॥ जन्मचन ये मागु-
ना ॥ तनूचा अभिमान टाकितां ॥ तनूचें मरण आपणा न से ॥
६८ ॥ मन आर्पण झालें ॥ तेणें गुरु रूपच अंगीं बाणलें ॥ हें-
शिष्याचे उगेपणें कळलें ॥ सद्गुरुसि सर्वथा ॥ ६९ ॥ आरे ज-

री माझें रूप आहेशि ॥ तरी वर्तणूक असावी माझिया- रेशी ॥ मी जैसा बोलें तुजशीं ॥ तैसें त्वां ही मजशीं बोलावें ॥ ७० ॥ तूं जरी उगा राहशी ॥ तरी आत्मा चकीं निश्चयेंशीं ॥ आणि बोलतां ही मजशीं ॥ काय नव्हशी तूं आत्मा ॥ ७१ ॥ जोच निश्चळ रूपणें बैसला ॥ तोच चंचळ पणें फिरला ॥ परी फिरतां बैसतां रूपाला ॥ पालट नसे तयाचे ॥ ७२ ॥ तैसा बोलतां कां उगा बैसतां ॥ तूं तो आत्माच तत्वता ॥ मग उगेपणाचा अभिमान वृथा ॥ धरिशी कां तो मज सांग ॥ ७३ ॥ उगें बसण्याचा संकेत असता ॥ तरी ईश्वर कर्मेंद्रियें ना निर्मिता ॥ विषय न कळावे हा हेतू असता ॥ तरी ज्ञानेंद्रियें निर्मिताना ॥ ७४ ॥ ईश्वर संकेत असे आन ॥ म्हणून इंद्रियां निर्माण ॥ कोंडिशी तरी कपण ॥ हो शील पनलें ग्यासारिखा ॥ ७५ ॥ तंव शिष्य बोलूं लागला ॥ जी मी गुरुरूप संचला ॥ तनु मन धन अर्पणाचें मजला ॥ वर्मसमूळ समजलें ॥ ७६ ॥ त्या येक शिष्यें असावें ॥ मग आर्पणा करूं बैसावें ॥ तें तो नाहींच स्वभावें ॥ म्हणून अघवें गुरूचें ॥ ७७ ॥ गुरु स्वरुपीं मी पण नाहीं ॥ आणि मीपण न से माझें गई ॥ म्हणून न करितांच आ-

र्पण पाहीं ॥ तनुमन धनाचें जाहलें ॥ ७८ ॥ ज्ञानें गेलिया अभिमान ॥ सर्वच होय ब्रह्मार्पण ॥ आपुले कृपेनें तयाची खूण ॥ कळली मज लानिश्चयें ॥ ७९ ॥ ध्याकदणाचें करावें ध्यान ॥ गुरुशिष्यपणाचें नसे भान ॥ मग साधन भक्ती घडे कैसेन ॥ हेंच मज ला सांगावें ॥ ८० ॥ अरे तुझ्या स्वरूपीं सीपण नाहीं ॥ तोच गुरु तु ज्ञातृ पाहीं ॥ आणि अंतःकर्ण जें स्फुरे देहीं ॥ तेंच शिष्य जाणावें ॥ ८१ ॥ तूंच अहोरात्र अंतःकर्णाशीं ॥ कर्पीन करण्याचे विचार देशी ॥ आणि साक्षित्वें वेगळा राहशी ॥ तोच अंतःकर्णाशीं गुरु तूं ॥ ८२ ॥ परी शुक्तिके अंगीं रजतभास ॥ तैसा आत्मत्वीं अंतःकर्णाचा वास ॥ पाहूं जातां प्रत्ययास ॥ जेसें तें तैसें हें ॥ ८३ ॥ बा रे स्व स्वरूपाचीजी आवडी ॥ तीच भक्ती घडे कुडी ॥ शर्करे अंगीं जेशी गोडी ॥ तेशी जडली अखंड ॥ ८४ ॥ म्हणून तूं आत्मपीनी नेजें करिशी ॥ तेंच भगवत्सेवनानिश्चयेशीं ॥ आतां साधन भक्ती अशेषीं ॥ तीच तुजशीं सांगतों ॥ ८५ ॥ स्वरुपीं ज्ञान अखंड आहे ॥ म्हणून नघाची भक्ती राहे ॥ परी देहसंगें आस-

ताहे॥ वियोग आत्म्याचा आपया ॥ ८६॥ ज्ञानें देहसंग
सुटला॥ आपण आपणा भेटला॥ योग म्हणावा त याला॥
वियोग गेला म्हणोनी॥ ८७॥ आत्म्याचा असावा अखंड
योग॥ ऐशी आवडी जिवीं चांग॥ धरून जो केला हठयोग॥
तीभक्तीच जाणावी॥ ८८॥ मित आहार विहार॥ मित जा-
गृत स्वप्न विचार॥ स्वरूपाचे भक्तीस्तव साचार॥ केला-
म्हणून भक्तीच ती॥ ८९॥ मित आचार विचार॥ मित-
निद्रा सर्व व्यवहार॥ आत्मप्राप्तीस्तव कर्यें साचार॥ तीच
भक्ती गुरूची॥ ९०॥ आसन धारणा ध्यान॥ प्राणायामा-
दी मुद्रा जाण॥ त्यांत आत्मे क्यतेचें अनुसंधान॥ तीच भ-
क्ती गुरूची॥ ९१॥ अथवा श्यामसुंदर कमलनयन॥
अजानुबाहु सुहास्य वदन॥ आत्मप्राप्तीस्तव ऐसें ध्यान॥
करणें तीच गुरुभक्ती॥ ९२॥ ऐसे अनेक विग्रह करिती॥
यती आत्मप्राप्तीची आशा धरिती॥ तीच जाणावी साधन-
भक्ती॥ तुज प्रकटोनी दाविली॥ ९३॥ ही ज्ञात्याशीं स-
हज होय॥ अज्ञान्याशीं करावा लागे उपाय॥ तो जरी-
सद्गुरूशीं शरण जाय॥ तरी उपाय न लागती॥ ९४॥
तूं तो निर्विकल्प आत्मा आहेसी॥ तुझी तो भक्ती असे तु-

जशीं॥ तीचम्यानिरोपिली जैशी तैशी॥ तुजकळावयाकारणें॥ ९५॥
आपणआत्माहें जाणणें॥ तयाआत्मनिवेदनमीम्ह्णे॥ तयाची आव-
डी अखंड धरणें॥ तीच भक्ती जाणिजे॥ ९६॥ ऐशी भक्ती आत्मनिवेद-
न॥ ज्ञानोत्तरकाळीं होयजाण॥ म्यां निरोपिली निर्यची खूण॥ तुजकळा
वयाकारणें॥ ९७॥ तंव शिष्य म्हणे सद्गुरुसमोर॥ जी भक्त दाविती च-
मत्कार॥ ऐसें बोलती अज्ञानी नर॥ ते खरें खोटें मज सांगा॥ ९८॥ बा-
रे अज्ञानी जें बोलती॥ तें त्यांनायकावें निश्चिती॥ कोणी चमत्कार दा-
विले नादाविती॥ मिथ्याचवदंती लोकांची॥ ९९॥ मी तुजला पांचवें प्र-
कर्णीं॥ सांगेन मुक्तांची रहणी॥ तीच धरून जनीं वनीं॥ सुखें वर्तावें
सर्वदां॥ १००॥ श्रीदत्तकृपा नारायण॥ पावला सहज शांती निर्वाण॥ त-
यापासोनि पूर्ण ज्ञान सखाराम पावला॥ १०१॥ विष्णू म्हणे सखाराम॥
सद्गुरु माझा पूर्णकाम॥ तयाचे कृपा पावलों परम॥ सहज आत्मैक्य
आपुलें॥ १०२॥ तें शिष्याचे निमिसें॥ सकळ जनांशिं दिनसें॥ घेती-
लविचारयुक्त मानसें॥ ते स्वसुख अनायासें पावती॥ १०३॥ इतीश्री
भावार्थसिंधू॥ चतुर्थप्रकर्णीं भक्तिबोधू॥ विष्णू म्हणे याचाछंदू॥ लागो
सकळ जनांशीं॥ १०४॥ ॥ श्रीरामार्पणमस्तू॥ ॥ छ॥

श्रीराम ॥ भावार्थसिंधूच्याचतुर्थप्रकर्णी ॥ भक्तियोगदाविलाअनुज-
लागोनी ॥ आतांमुक्तें कसेंवर्तावेंजनी ॥ तीच रहणी सांगतों ॥
१ ॥ बारेजयाचातुटलाअज्ञानबंद ॥ तोच्मुक्त तोच स्वच्छंद ॥
स्वच्छंद म्हणजे आत्मछंद ॥ सर्वकाळलागला ॥ २ ॥ तोजि-
कडे जिकडे जाय ॥ तिकडे तिकडे आपणा पाहे ॥ म्हणे अव-
घा आत्माच आहे ॥ जनींवनीं हिंडतां ॥ ३ ॥ तयाप्रारब्धें घड-
ती सुखभोग ॥ अथवा लागती रोग ॥ परी लिप्त नव्हे निःसंग ॥
हर्षविषादे तयाचे ॥ ४ ॥ कोणींतयाशिं वंदिती ॥ कोणीतयाशिं
निंदिती ॥ परी असेनाभिनी स्वंती ॥ आत्मज्ञानेकरोनी ॥ ५ ॥ को-
णी म्हणती आचारसील मोठा ॥ कोणी म्हणती भ्रष्टकरंटा ॥
परीतयाशिं नुपजे ताठा ॥ आत्मज्ञानाचे बळानें ॥ ६ ॥ तोम्हणे
जगेशीं मजशीं ॥ भेदच नाहीं निश्चयेशीं ॥ लोक म्हणावें को-
याशीं ॥ आत्मानिश्चयेशिं मी असें ॥ ७ ॥ तंव शिष्य म्हणे गु-
रुनाथा ॥ जगेशिं मुक्ताशिं ऐक्यता ॥ तरी लोकमनीचें तत्व-
ता ॥ कांनकळे हें मज सांगा ॥ ८ ॥ बारे जो मनीचें जाणतां ॥
तो साक्षी आत्मा तत्वता ॥ अभेद नव्हे सर्वथा ॥ साक्षित्व आहे
तोंवरी ॥ ९ ॥ साक्षित्व जयानाहीं ॥ तोच अभेद आत्मा पाहीं ॥
मुक्ताशीं प्रतीती मीही ॥ तयाचीच आलीसे ॥ १० ॥ साक्षीने स्व-

साक्षित्व केलें ॥ तें त्यास मुक्तपण आलें ॥ तेथें स्वमनाचें कळ-
णें गेलें ॥ मग अन्यमन कळेल कैसें ॥ ११ ॥ म्हणून स्वसाक्षित्व
करितां अभेद मुक्त ॥ मनाचे साक्षित्वें भेद युक्त ॥ ऐशी ज्ञानी
घेती प्रतीत ॥ येरां शीं गाथा गोंवी ॥ १२ ॥ ऐसा देहचतुष्टयांचा
साक्षी ॥ तो अभेद नव्हे निश्चयेंशीं ॥ परी स्वसाक्षित्वें आपणा
शीं ॥ अभेदपणें पाहात से ॥ १३ ॥ मनाचें जया साक्षित्व नसे
॥ तोच अभेद विश्वासें ॥ जो मनांचें साक्षित्व करीतसे ॥ तो अ-
सेक देहीं वेगळा ॥ १४ ॥ देहचतुष्टय जरी झालें ॥ तरी पंचभू-
तांनच आलें ॥ येरा निर्गुण संचलें ॥ साक्षित्वातीत सहजीं सह-
ज ॥ १५ ॥ देहांतील साक्षी आकाश ॥ जाणें पृथ्वी आप तेज-
वायूस ॥ तोच स्थूल देहहा विश्वास ॥ अंतरीं बांधरावा ॥ १६ ॥
पृथ्वीचें साक्षित्व सोडून ॥ आपतेजवायूचें साक्षित्व जाण ॥
आकाश करीती खूण ॥ सूक्ष्मदेहाची समजावी ॥ १७ ॥ पृथ्वी
आपाचें साक्षित्व जाय ॥ तेजवायूचें साक्षित्व आकाश होय ॥
तोच जाणावा कारणदेह ॥ सुषुप्ती अवस्था नयाची ॥ १८ ॥ पृ-
थ्वी आपतेजाचें ॥ साक्षित्व गेलें साचें ॥ राहिलें साक्षित्व वायू-
चें ॥ महाकारणदेह तो ॥ १९ ॥ वायू सर्वहर पला ॥ साक्षित्वाचा
भाव भंग गेला ॥ आकाश कोण म्हणे त्याला ॥ अभेद संचला म्ह-

योनी ॥ २० ॥ ऐशीया अभेद आत्म्याशी ॥ मन साक्षित्व कैचें त्या-
शीं ॥ आणि साक्षित्वें वर्तेंमनेंशीं ॥ अभेद तयाशिं कोण म्ह-
णे ॥ २१ ॥ मनाचें साक्षित्व करितां भेद ॥ तोच स्व साक्षित्व करि-
तां मुक्त अभेद ॥ ऐसा जाणोनियां बोध ॥ उभय साक्षित्वें वर्तती ॥
॥ २२ ॥ जैसें वृक्षनाव येक ॥ परी वृक्षांचे भाव पृथक ॥ तैसें साक्षी
आत्मा नाव येक ॥ परी प्रत्येक देहीं वेगळा ॥ २३ ॥ तोच स्व-
साक्षित्व जें करी ॥ तें अभेद सुक्त पण आपुलें वरी ॥ तेथें म
नाचे साक्षित्वाची उरी ॥ नराहेच सर्वथा ॥ २४ ॥ अरे यांती
रूप्रतिबिंब त्यांत नेतां ॥ श्रम केले तितुके व्रथा ॥ तैसेंच अ
न्य मनाचें साक्षित्व करितां ॥ नयेच सर्वथा कोणाशीं ॥ २५
॥ परी गायन समई ताळ धरितां ॥ उडता काग आला हातां ॥
तैशी वोळा फुलांगांवर पडतां ॥ लोक सिध्धाई मानिती ॥ २६ ॥
ऐशी रेणूपासोन इभवरी ॥ सर्व देहांची येकच परी ॥ यांचें आ-
सन कळेनि र्धारीं ॥ हा ईश्वरें नियम केला ॥ २७ ॥ अंतःकर्ण
शुध्यर्थ साधनें असती ॥ साधन रोचनार्थ सिध्धी कथिती ॥
परी सिध्धी स्वर्गादी भुक्तीच नसती ॥ हें जाणती ते साधू ॥ २८ ॥
अरे मनाचें साक्षित्व असतां ॥ जो करी स्व साक्षित्व तत्वतां ॥ तो-
च मुक्त साक्षित्वापरता ॥ हें वर्म जाणावें ॥ २९ ॥ मनाचें साक्षि

त्व करितां भेद ॥ स्वसाक्षित्व करितां अभेद ॥ ऐसें उभयवर्मेंसि ध्याचा ॥ जाणोनि जगीं वर्तती ॥ ३० ॥ संपूर्ण विश्वाचा देह येक ॥ आत्मेने धरिला सम्यक ॥ ऐसा तुक्यांचा विवेक ॥ तोही तुजला सांगतों ॥ ३१ ॥ ब्रह्मस्वरूप सहज स्थिर ॥ शांत अविनाश गंभीर ॥ ज्ञानघन भरपूर ॥ जेथें तेथें असलाचि असे ॥ ३२ ॥ तयावरील वातावर्ण ॥ तेंच त्याचें त्वगेंद्रिय जाण ॥ जिवांचे जे पंचप्राण ॥ तें ही त्वगेंद्रिय आत्म्याचें ॥ ३३ ॥ सूर्याचे पोटिंचें वातावर्ण ॥ तैसें च पृथ्व्यादिकांचे पोटीं जाण ॥ जितुकें मिळोन वातावर्ण ॥ तितुकें त्वगेंद्रिय आत्म्याचें ॥ ३४ ॥ सूर्य पृथ्व्यादी जगें ॥ कितीयांचा अंत न लगे ॥ तितुक्यांतील वातावर्ण अंगें ॥ आत्म्याचें त्वगेंद्रिय समजावें ॥ ३५ ॥ आतां त्वगेंद्रिय झाला वायू ॥ ध्यान भावना असती बहू ॥ तोच अन्य इंद्रियांचा समुहू ॥ ऐक सांगतों तुजलागीं ॥ ३६ ॥ येर सूर्य पृथ्व्यादी शरिरें ॥ वातावर्णाशीं जडलीं बारे ॥ तीं त्वगेंद्रियावरील मक निर्धारें ॥ आत्म्याचे हे जाणावें ॥ ३७ ॥ ऐशिया भावनेनें ॥ जगेशीं आपणा ऐक्य पाहणें ॥ म्हणून युक्ती कल्पिली मनें ॥ त्यां भावनें धरावी ॥ ३८ ॥ सूर्य पृथ्व्यादिकांचें मन ॥ तेंच आत्म्याचे रोम जाण ॥ आपले आवरील जिवांचीं मनें ॥ तीं बारीक लव समजावी ॥ ३९ ॥

घ्रातावर्ण त्वगेंद्रिय॥ त्यांतचमनाचीउत्पत्ती होय॥ म्हणू-
न मनचरोमलेंचपाहे॥ त्वगेंद्रियावरीलआत्म्याचे॥ ४०॥
परस्परजगांचें आकर्षण॥ त्याचनिर्गुणाच्यानाडीजाण
॥ वायूच्याथरांचेंपुष्टपण॥ तेंचआत्म्याचेंमांसअसे॥
४१॥ जगांचा परस्परजडलाभाव॥ तोअस्थींचा समुदाव
॥ हा पृथ्वीरूपअवयव॥ आतांआपतत्वतें ऐक॥ ४२॥
घ्रातावर्ण आणिमन॥ आकर्षणपुष्टपणऐक्यभावन॥
यांचें ज्यानियमेंपोषण॥ तोचनियमआपतत्व॥ ४३॥
नियमाचीजीशक्ती॥ तीआत्म्याचेंतेजनिश्चिती॥ शक्ती
करीजेथेंवस्ती॥ तेंचआत्म्याचेंवायुतत्व॥ ४४॥ इतुकि-
यांशीं जेंजाणें॥ तेंचनिर्गुणदेहींचें आकाशमी म्हणें॥ हा
विराटदेहजोजाणे॥ तोऐक्यपणेंवर्तेल॥ ४५॥ आतांजि-
वांशीं स्वस्वरुपाचाविसर॥ तोहिरण्यगर्भदेह निर्धार॥
आणिमीचब्रह्म भावनिरंतर॥ तो आत्म्याचा कारणदेह
॥ ४६॥ ब्रह्मभावनेचा जोसाक्षी॥ तोमहाकारणदेह लक्षीं
॥ मगलक्षठेऊन अलक्षीं॥ अभेदराहींसर्वदा॥ ४७॥ ऐ-
शीजयांचीस्थिती॥ तेभेदकहींचनधरिती॥ सदां अभे-
दपणें राहती॥ लोकरवंतीसोडोनी॥ ४८॥ म्हणतीदेह

आणिप्राण॥ यांचेआंतआम्ही गगन॥मुखबाहेरआंत परिपूर्ण॥भरलोंआहोंसर्वदा॥ ४९॥ भावधरावादेहास तेचा॥तरीचभेदजगाचा॥भावधरितांस्वात्म्याचा॥भे-दकैंचाअसेल॥५०॥विषयेंद्रियप्राणे॥मजलाधरिलेंना-हींतेणे॥मीचसाक्षित्वेंतयाजाणे॥ तोमी आकाशसहजअ-सें॥५१॥ मीअन्यसाक्षित्वेंआकाश॥ तोचस्वसाक्षित्वें-निराभास॥ऐशापावोनीप्रत्ययास॥ मुक्तदेहींवर्ततसे ॥५२॥ साक्षित्वदेहाचेंजावें॥तरीचमुक्तम्हणावें॥ऐसेंना-हींस्वभावें॥स्वसाक्षित्वेंमुक्तहोय॥ ५३॥ बंधमुक्तपणा चीवार्ता॥ब्रह्मींनाहींतत्वता॥ब्रह्मअसेसाक्षित्वापरता ॥बंधमुक्तासाक्षीशीं॥५४॥ ऐसेंजाणोनिमुक्त॥जगींव-र्ततीनिभ्रांत॥तयांशिंझालियाशरणागत॥ आपणासा रिखेंकरितीत्या॥ ५५॥ शिष्यम्हणेजीसद्गुरु॥शरणाग-तांशिंसाक्षात्कारु॥मुक्तदेती तोप्रकारू॥ कृपाकरो-निसांगावा॥५६॥ कायसांगतीतयांशीं॥ हेंकळलें या-हिनेमजशीं॥ बारेशेकथ्ययेशीं॥कैसाउपदेशकरितीतो ॥५७॥ मनुष्यदेहप्राप्तझाला॥ तोपरमार्थाधिकारीबोलि-ला॥ हाभावमुक्तांला॥ ठावाअसेअंतरीं॥५८॥ तरीशर-

यांगताचा अधिकार॥तैसाच उपदेशाचा प्रकार॥परी सर्वांशीं आत्मस्वरूपाचा निर्धार॥केल्यावीण न सोडिती॥ ५९॥तेन या-हतीं जातीगोत॥न म्हणती स्त्री पुरुष निश्चित॥मनुष्यमात्र श-रणांगत॥आलिया उपदेश करिताती॥ ६०॥आतां अधिकारा ऐसा उपदेश॥तो भाव ऐका विशेष॥जया निर्गुणी लाविता येमानस॥तया तूं ब्रह्म हें सांगती॥ ६१॥तूं स्थूल सूक्ष्म कारण महाकारण॥चारी देहां हून वेगळा जाण॥पाहे अंतरीं न्याहळून॥ऐसें निश्च शिकविती॥ ६२॥पंचवीस तत्वांचा देह स्थूल॥पंचवीस तत्वांचा लिंगदेह जाण॥दोघांचा ही साक्षी केवळ॥तूंच ब्रह्म आहेसी॥ ६३॥मी कोण हें मला न कळे॥ऐसा अभिमान धरिशी बळें॥तें न कळणें तुजला कळे॥तूं तयावेगळा॥ ६४॥न कळणें तो कारणदेह॥तूं त-याचा साक्षी विदेह॥आतां मीच ब्रह्म हा भाव॥हा महाकारणदेह तूं नव्हशी॥ ६५॥तूं मी ब्रह्म ऐसें भाविशी॥ती भावना कळे तुज्ञी तुजेशी॥तरी तूं साक्षित्वातीत ब्रह्म आहेशी॥देहचतुष्टयांशीं अलिप्त॥ ६६॥देहचतुष्टयांचा कल्पना॥तूं न करिशी रे निर्गुणा॥बंध मोक्षाची भावना॥त्यांच निर्गुणे धरियेली॥ ६७॥म्हणून दे-हचतुष्टय असतां॥तूं निर्गुणाच तत्वतां॥पंचकोशांही परता॥स-हजीं सहज आहेशी॥ ६८॥अन्नमय प्राणमय मनोमय॥विज्ञान

मयआनंदमय॥यापंचकोशांतीत स्वयमेव॥ सत्यवस्तू आहे-
शी॥६९॥पृथ्वीआपतेज पवन॥ पांचवें जाणावें गगन॥ या हू-
न वेगळा निर्गूण॥ तूं आत्मा आहेशी॥ ७०॥ देहपिंजरा वमोगूण
॥ स्वासोच्छ्वास कोमून॥ साक्षी अंतःकरणांचा गूण॥ तूं नि
र्गूण वेगळा॥ ७१॥ पंचज्ञानेंद्रियें विषयजाणशी॥ पंचकर्मेंद्रियें क्रि
या करिशी॥ अंतर्बाहेर व्यापारी॥ तो तूं आहेशी सद्वस्तू॥ ७२॥ ऐ
सें आपआपणा पहावें॥ निरंतर श्रवण मनन करावें॥ हा उपदे-
श स्वभावें॥ अधिकारी मुमुक्षूंस करावा॥ ७३॥ ज्यांसि हा अ-
धिकार नाहीं॥ आणि संसारीं गुंतून गेले काहीं॥ शरण यें न ये
ती चकहीं॥ त्यांचा उपाय सांगतों॥ ७४॥ नवो कवितांच जावें
ते थे॥ वर्णावें सगुण ध्यान निश्चित॥ रोकडा अनुभव येत॥ तुज
कथा यथा सांगतों॥ ७५॥ जन हो तुम्ही संसार करा॥ परी तार
क राम मनीं स्मरा॥ नरदेह ऐसा अमोल्य दूसरा॥ पुन्हां देह न
मिळेची॥ ७६॥ म्हणून शाम सुंदर कमळनयन॥ किरीट कुंड
ले विराजमान॥ भाळीं तिलक शोभे पूर्ण॥ ऐसा राम स्मरावा॥
७७॥ वक्षस्थळीं दिव्य कौस्तुभ॥ येकावळी पदकें सुप्रभ॥ ऐसा
जानकीवल्लभ॥ राम अंतरीं स्मरावा॥ ७८॥ कटि घागरियांच
[illegible]गीं तोडर॥ मुद्रिका कंकण युक्त कर॥ आजानुबाहू गुणगंभी-

। ऐसा रामस्मरावा ॥ ७९ ॥ अधरारक्तदिव्यदशन ॥ नंदनशोभायमान ॥ प्रकाशीं न तुळती कोटिभान ॥ ऐसा रामस्मरावा ॥ ८० ॥ जन होध्यानीं न ये मूर्ती ॥ तरी प्रा- करा निश्चिती ॥ हे राम हे तारक मूर्ती ॥ शरण तुज प्रती असे ॥ ८१ ॥ तूं निर्गुण निराकार असशी ॥ इच्छामात्रें स- या हे शी ॥ पापापासोनि सोडविशी ॥ ऐसा भरवंसा आहे ॥ ८२ ॥ रामा शरण रामा शरण ॥ रामा शरण रामा शरण । रामा शरण रामा शरण ॥ ऐशी प्रार्थना करा ॥ ८३ ॥ नि य ऐशी प्रार्थना करी ॥ आणि सुखें रा स्वव्यापारीं ॥ त्याशिं आ- त्मज्ञान अंतरीं ॥ देईल राम कृपाळू ॥ ८४ ॥ आत्मज्ञानें पातक- जाय ॥ प्राणी अ द मुक्त होय ॥ तरी प्रार्थनेची सोय ॥ धरा म्हणु न शिकवावें ॥ ८५ ॥ अज्ञान आणि अभिमान ॥ जन्ममरणा तपा डती जाण ॥ म्हणून पातक ऐसें अभिधान ॥ तयां चें च जाणावें ॥ ८६ ॥ आतां आत्मज्ञानें जाय अज्ञान ॥ तया संगें जाय अभिमान ॥ प्राणी तरे जन्ममरणापासून ॥ म्हणून तारक ज्ञान समजावें ॥ ८७ ॥ अभिमान पातक म्हणोन निषेध ॥ ज्ञान तारक विधि शुध्द ॥ ऐसा उपदेश प्रसिध्द ॥ सकळ जनां सकरावा ॥ ८८ ॥ अज्ञान आ- णि अभिमान ॥ हेंच निषेध पातक जाण ॥ मीच ब्रह्म हें जाणि ने-

१२९३६



शिंज्ञान॥ तोचतारकविधीसमजावा॥ ८९॥ म्हणूनज्ञानहोरा
स्मरा॥ तारकआत्मज्ञानमनींधरा॥ यातकोभिमाना ॥सोनन
रा॥ एसाउपदेशकरावा॥ ९०॥ पृथ्वीवरीलमनुष्यमा ॥भेदूच
हिंदूसकळजात॥ उपदेशासअधिकारीनिश्चित॥ हीचमाशी
आम्होअसे॥ ९१॥ मनुष्यजातीअसेथेक॥ हेंचज्ञानसं म्यक॥
साजाणोनाविवेक॥ मुक्तेंउपदेशकरावा॥ ९२॥ सकळकहीपें
कळखंडें॥ मुक्तेंफिरावींउदंडें॥ मोडूनमतवादांची बंडें॥ उ
देशज्ञानाचाकरावा॥ ९३॥ केराका आळियापडूनराहवें॥ उद
निमित्यउद्योगकरावें॥ प्रारब्धावरीनघालवावें॥ वेडगळासारि
आयुष्य॥ ९४॥ प्रयत्नकरितांझालेंप्राप्त॥ नयाचेंनवप्रारब्ध
सत्य॥ कांहींजन्मांतरींचाप्रयत्नेंप्राप्त॥ याजन्मीहोतसे॥ ९५
नंवाशिष्यम्हणेगुरुनाथा॥ मागीलजन्मींचेंस्मरेनाआतां॥
द्रेंतूनजागाहोतां॥ स्मरेतैसेंस्मरावें॥ ९६॥ याचेंएकउत्तर
तूंबाळपणींक्रिडाकेलीनिर्धार॥ तीतुम्हीतुजचनाठवेसा
॥ याचेंकारणसांगावें॥ ९७॥ बाळक्रीडातुम्हीतुजनाठवे॥ ज
न्मांतरकेसेंआठवे॥ हेंएकोनस्वभावें॥ शिष्यहसूंलागला॥
॥ म्हणेमाज्ञानमजलादृष्टांतदिल्हा॥ म्हणूनमजीचासंशयगे
॥ कळकें पुनर्जन्मप्राणियाला॥ अज्ञानआहेतोंवरी॥ ९९॥